अस्सल सोलापुरी
सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड
शुक्रवार, दि. १६ जून २०२३
वर्ष : २१ वे ▸ अंक : २५७ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

‘चिमणी’चा खेळ खल्लास !

अवघ्या ५ सेकंदात झाला अस्त

एक नारी ‘कारखान्या’ला पडली भारी

सुराज्य/सोलापूर

कुमठे येथील श्री सिद्धेश्वर साखर कारखान्याची को-जनरेशनची अनधिकृत आणि वादग्रस्त ठरलेली तब्बल ९२ मीटर उंचीची बेकायदा चिमणी सलग ३५ तासांच्या ‘पाडकाम ऑपरेशन’ नंतर गुरुवारी दुपारी ३.५२ वाजता जमीनदस्त करण्यात आली आणि २०१४ पासूनच्या चिमणीचा अस्त झाला. केवळ पाच सेकंदात ही चिमणी जमिनीवर आडवी झाली. वेगवेगळ्या कटर्स आणि ब्रेकरच्या सहाय्याने कट करून आणि केबलने हिसका मारुन चिमणी पाडण्यात आली. महापालिका आणि पोलीस प्रशासाने युद्ध पातळीवर ही कार्यवाही पूर्ण केली. चिमणी पडतानाच्या क्षणी परिसरात निरव शांतता पाहायला मिळाली. अखेर या चिमणीचा खेळ खल्लास झाला. दरम्यान, महापालिकेच्या आयुक्त शीतल तेली-उगले यांनीच हे करून दाखवले. ‘एक नारी पडली कारखान्याला भारी’ अशी चर्चा आता सुरू झाली आहे.

सोलापूर महापालिका आयुक्तांनी स्वतंत्र सुनावणी घेत चिमणी पाडण्याचे आदेश दिले. कारखान्यास ४५ दिवसात साखर कारखान्याने स्वतःहून ही चिमणी पाडून घेण्याची मुदत दिली होती. मुदत अखेर ११ जूनला संपली. मात्र कारखान्याने चिमणी पाडली नाही. त्यामुळे महापालिकेने पोलीस प्रशासनास सोबत घेत कारवाई केली. १४ जून पासून कारखान्याच्या अनधिकृत चिमणी पाडकाम प्रक्रिया युध्दपातळीवर सुरू करण्यात आली. पहिल्या दिवशी चिमणी जवळ असलेले बगॅस, पत्रे, वायरिंग आदी साहित्य काढण्यात आले. गुरूवारी म्हणजे १५ मे रोजी सकाळी कारखान्याकडून येणारा चिमणीला जोडणार मुख्य डक्ट काढण्यात आला. त्यानंतर आजूबाजूचे इतर साहित्य काढत दुपारी ३ वाजून ५० मिनिटांनी चिमणी पाडकाम ऑपरेशन पूर्ण केले. पाच सेंकदातच ही चिमणी जमिनीवर आडवी झाली. बुधवारी पोकलेनद्वारे चिमणीला एकूण २० छिद्रं पाडली होती. या २० छिद्रामधून केबल वायर यातली होती. चिमणी कोणत्या बाजूने पाडायची याचा अभ्यास करुन क्रेनच्या सहाय्याने त्या साखर कारखान्याच्या मागील बाजूच्या मोकळ्या जागेत हिसका मारुन आडवी करण्यात आली आहे. ती पाडताना कुठलीही कुणाला साधे खरचटले नाही की जीवितहानी झाली. यावेळी परिसरात तगडा पोलीस बंदोबस्त तैनात होता. यामुळे आतमध्ये कुणालाही शिरकाव करता आला नाही.

बेंगलोरच्या बिनियास कंपनीला दिला होता मक्ता

सिद्धेश्वर साखर कारखान्याच्या को-जनरेशन चिमणी पाडण्यासाठी तांत्रिकदृष्ट्या तज्ज्ञ असलेल्या बेंगळूर येथील बिनियास कन्स्ट्रक्शन कंपनीला एक कोटी १७ लाख रुपयेचा मक्ता देण्यात आला होता. नियोजनपूर्वक या कंपनीने तांत्रिक कौशल्य वापरून अखेर ही चिमणी पाडण्याचे काम पूर्ण केले. या कामासाठी एकूण अनुभवी असे २० ऑपरेटर कार्यरत होते. चिमणीच्या तळाशी कट करण्यात आले. तळाला कट करण्यासाठी पंधरा मिनिटांचा अवधी लागला. होल पाडून दोरीच्या सहाय्याने चिमणी ढकलून पाडण्यात आली.

जिलेटिन अथवा स्फोटकाचा वापर केला नाही : आयुक्त

चिमणी पाडकामावेळी स्वतः आयुक्त शितल तेली-उगले या कारखाना स्थळावर हजर होत्या. चिमणीला जोडण्यात आलेले विविध भाग अगोदर सुटे करण्यात आले. त्यानंतर विविध कटर्स आणि ब्रेकरच्या सहाय्याने आजूबाजूनचे भाग कट करण्यात आले. शेवटी रिकाम्या मैदानात ती ओढून पाडण्यात आली. यासाठी कोणत्याही जिलेटिन अथवा स्फोटकाचा वापर करण्यात आला नाही, अशी माहिती महापालिका आयुक्त शितल तेली-उगले यांनी दिली.

पोलीस प्रशासनाने निर्बंध केले शिथिल

श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याची चिमणी पाडकामाकरिता पोलीस प्रशासनाने कारखान्याच्या एक किलोमीटर परिसरात लागू केलेले निर्बंध गुरुवारी सायंकाळी शिथील केले आहेत. सुमारे २१०० पोलीस तैनात करण्यात आले होते. चिमणी पाडण्याचे काम पूर्ण झाल्याने गुरुवार सायंकाळपासून संचारबंदी तसेच पर्यायी रस्त्यांबाबतचे निर्बंध हटवल्याचे पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांनी जाहीर केले.

विमानसेवा सुरू होऊन विकासाला चालना मिळेल : केतन शहा

चिमणीचा अडथळा गेल्यामुळे आता सोलापुरात विमानसेवा सुरू होईल. लवकरात लवकर विमानसेवा सुरू होण्यासाठी सोलापूर विकास मंचचे सर्व सदस्य उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना भेटणार आहेत. विमानसेवा नसल्यामुळे सोलापुरात अनेक उद्योगधंदे येत नव्हते. आता विविध कंपन्या येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विमानसेवा सुरू झाल्यामुळे सोलापूर शहरातील तीर्थक्षेत्रांचा ही विकास मोठ्या प्रमाणात होईल, अशी अपेक्षा आहे केंद्र सरकारने आता लवकरात लवकर सोलापूरमध्ये मोठे प्रोजेक्ट द्यावेत, असे सोलापूर विकास मंचचे सदस्य केतन शाळा यांनी सांगितले.

सोलापूरसह बार्शी बाजार समितीला मुदतवाढ

▸ शासनाचा आदेश निघाला

सुराज्य/सोलापूर

सोलापूर व बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या विद्यमान संचालक मंडळांना शासनाने पुढील ६ महिने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

याबाबत शासनाचा आदेश निघाला असून सोलापूर बाजार समितीत आमदार विजयकुमार देशमुख आणि बार्शी बाजार समिती आमदार राजेंद्र राऊत यांच्या गटाला आणखी सहा महिने कारभार करायला संधी मिळाली आहे. सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालकांची मुदत १५ जुलै रोजी संपणार आहे. तर बार्शी बाजार समितीच्या संचालकांची मुदत २३ जुलै रोजी संपणार आहे.

तत्पूर्वी निवडणूक प्रक्रिया राबविणे अपेक्षित होते मात्र निवडणूक प्रक्रिया पार न पडल्याने आणि आता पावसाळ्यामध्ये निवडणुका घेता येत नसल्याचे कारण देत राज्य शासनाने विद्यमान संचालकांना सहा महिने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. तत्पूर्वी दोन्ही बाजार समितीच्या वतीने मुदत वाढीसाठी जिल्हा उपनिबंधकांच्या माध्यमातून राज्य शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

यावर मागील काही दिवसापासून मुदतवाढ मिळणार असल्याची चर्चा सुरू होती. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर अखेर मुदत वाढीसंदर्भात पणन विभागाच्या सहसचिवांनी आदेश काढला आहे. त्यामुळे सोलापूर बाजार समिती सभापती आ. देशमुख व बार्शी बाजार समितीत आ. राऊत यांचे चिरंजीव सभापती रणवीर राऊत यांना आणखी सहा महिने कारभार करता येणार आहे.

सोने उशाला घेऊन झोपलेली पिशवीच चोरट्यांनी पळवली

सुराज्य/मोहोळ

चोरीच्या भितीने घरातील सोन्याचे दागिणे व रोख रक्कम असा १ लाख ८९ हजार रुपयांच ऐवज एका पिशवीत ठेवून ती उशाखाली ठेवून झोपलेल्या व्यक्तींची पिशवीच चोरट्याने पळविली. हा प्रकार मोहोळ तालुक्यातील शेटफळ येथे घडला.

शेटफळ येथील किरण प्रभाकर भांगे हे आजूबाजूच्या परिसरात चोरीचे प्रमाण वाढल्याने घराला कुलूप लावून रोज घरातील अंगणात झोपतात. बुधवार दि. १४ जून रोजी रात्री जेवण करून सोने व रोख रक्कण एका पिशवीत भरून पिशवी उशाला घेऊन रात्री १० वाजता किरण भांगे व त्यांची पत्नी झोपले. पहाटे अडीच वाजण्याच्या सुमारास त्यांना जाग आली असता उशाजवळ सोने ठेवलेली पिशवी नव्हती. त्यांनी इतरत्र शोधा शोध घेतला. परंतु ती मिळून आली नाही म्हणून त्यांना चोरांनी चोरी केली असल्याची खात्री पटली. त्यामध्ये सात ग्रॅम वजनाची बोरमाळ, फुले, झुबे, ठुशी, अंगठी, रिंग व ५०० रुपयाच्या रोख नोटा असा १ लाख ८९ हजार रुपयाचा ऐवज लंपास केला.

घरफोडी करणाऱ्या गुन्हेगारास दोन वर्षाची शिक्षा

सुराज्य/सोलापूर

घरफोडीचे गुन्हे करणारा सराईत आरोपी शशिकांत ऊर्फ पिल्या अनिल राक्षे याला प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी पारशेट्टी यांनी २ वर्षे १५ दिवसांचा साधा कारावास व २ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. आरोपीवर घरफोडी, चोरी, जबरी चोरी असे विविध ४० गुन्हे दाखल आहेत.

गुन्हे शाखेचे सपोनि निरगुडे यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरून त्यांनी आरोपीला ताब्यात घेतले होते. आरोपीने २०१६ मध्ये विजापूर नाका पोलिस ठाणे हद्दीतील जुने संतोष नगर, जुळे सोलापूर या ठिकाणी घरफोडी करून चोरी केली असल्याचे सांगितले. त्याच्याकडून चोरी केलेल्या दागिन्यांपैकी ३ तोळे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले होते. आरोपीने गुन्ह्याची कबुली न्यायालयासमोर दिली. त्यामुळे न्यायालयाने आरोपी शशिकांत राक्षे यास २ वर्षे १५ दिवस साधा कारावास व २ हजार रुपये द्रव्य दंडाची शिक्षा सुनावली.

या खटल्याचे कामकाज सरकारी पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता सार्थक चिवरी यांनी पाहिले आहे. तसेच गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक सुनील दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहा. पोलिस निरीक्षक जीवन निरगुडे, हवालदार दिलीप भालशंकर, वाजीद पटेल, पोना योगेश बर्डे, संजय साळुंखे यांनी कामगिरी बजावली.

तब्बल ७ वर्षांनंतर हा गुन्हा उघडकीस

गुन्हा घडल्यानंतर तब्बल ७ वर्षांनंतर हा गुन्हा उघडकीस आला. त्याच्यावर नमूद सराईत आरोपीवर घरफोडी, चोरी, जबरी चोरी असे सुमारे ४० गुन्हे दाखल आहेत, अशी माहिती पोलिसांनी दिली.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

विकासला बोलव, आता मला कोणतेही कारण नकोय !

कल्याण

मेन बाजार

फिनिक्स झेप घेत लालपरीची वाटचाल गतवैभवाकडे

४ हजार कोटींचा तोटा आला १० कोटींवर

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्राची दैनंदिन जीवनवाहिनी असलेली लालपरी अर्थात एसटी महामंडळाची वाटचाल गतवैभवाकडे सुरू असल्याने अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.महामंडळाचा तोटा ४ हजारावरून १० कोटींवर आला आहे.त्यामुळे महामंडळ फिनिक्स झेप घेत फायद्याकडे मार्गक्रमण करत आहे.

गाव तेथे एसटी हे ब्रीद कायम ठेवताना आर्थिक अडचणींनादेखील एसटी महामंडळाला सामोरे जावे लागत होते. एसटी संपानंतर पुन्हा प्रवाशांच्या सेवेत आलेल्या एसटी समोर आर्थिक अडचणी कायम होत्या. मागील वर्षभरापासून तब्बल ४ हजार कोटी रुपये तोट्यात असलेली एसटी आता लवकरच फायद्यात येण्याची शक्यता आहे. एसटी महामंडळाचा हा तोटा अगदी दहा कोटी रुपयांवर आला आहे.

महाविकास आघाडी सरकारच्या काळात तब्बल सहा महिने एसटी महामंडळातील कर्मचारी संपावर होते. त्यानंतर एसटी महामंडळाला तब्बल ४ हजार कोटी रुपयांचा तोटा झाल्याची बाब समोर आली होती. त्यामुळे एसटी महामंडळ पुन्हा फायद्यात येणार की नाही याची चर्चा जोरदार सुरू होती. एसटी महामंडळाचा चार हजार कोटी रुपये एकीकडे तोटा असताना दुसरीकडे गाड्या चालवण्यासाठी डिझेलसाठी पैसा देखील उपलब्ध नसल्याची बाब समोर आली होती. अजित पवार अर्थमंत्री असताना महिना ३०० कोटी रुपये देण्याची सरकारने कबुली दिली होती. मात्र ती देखील रक्कम वेळेत न मिळाल्याने तोटा दिवसेंदिवस वाढत चालला होता. दिवसेंदिवस वाढत जाणारा तोटा कमी करण्यासाठी एसटी महामंडळाला खऱ्या अर्थाने राज्य सरकारच्या मदतीची गरज होती. दरम्यानच्या काळात एसटीने प्रवास करण्यापेक्षा खाजगी वाहनांना प्रवास करण्याकडे नागरिकांचा ओढा वाढत होता. मात्र त्यावेळी नव्याने सत्तेवर आलेल्या शिंदे फडणवीस सरकारने दोन महत्त्वाचे निर्णय घेतले आणि याचा फायदा एसटी महामंडळाला झाल्याचे पाहायला मिळाले.

एसटी महामंडळाने ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के आणि ७५ वर्ष पूर्ण झालेल्या नागरिकांना १०० टक्के प्रवासात तिकीटात सवलत दिली.

मिळालेला फायदा : ७५ वर्ष पूर्ण केलेल्या नागरिकांना मोफत प्रवास या योजनेसाठी सरकारकडून मिळालेली रक्कम ९१ कोटी रुपये.महिलांना ५० टक्के तिकीट सवलत योजनेसाठी सरकारने प्रतिपूर्तीसाठी दिलेली रक्कम - १७९ कोटी रुपये.६५ ते ७५ वय असलेल्या नागरिकांना ५० टक्के सवलत योजनेसाठी सरकारने दिलेली रक्कम २६ कोटी रुपये

एसटी महामंडळाचे १८ विभाग फायद्यात : एसटी महामंडळाचे राज्यातील ३१ विभागांपैकी १८ विभाग सध्या फायद्यात आहेत. यामध्ये बीड पहिल्या क्रमांकावर असून परभणी दुसऱ्या आणि जळगाव तिसऱ्या क्रमांकावर आहे. बीड विभागाला मे महिन्यात साडेतीन कोटी रुपये परभणी विभागाला तीन कोटी रुपये आणि जळगाव विभागाला दोन कोटी ९० लाख रुपयांचा फायदा झाला आहे. पुढील महिन्यात हीच रक्कम आणखी वाढेल असा विश्वास एसटीच्या अधिकाऱ्यांना आहे.

शिंदे फडणवीस सरकारने घेतलेले या दोन महत्त्वाचे निर्णयामुळे हळूहळू एसटीची आर्थिक क्षमता रुळावर येत असल्याचे पाहायला मिळत असल्याचे बोलले जात आहे. आता पुढील काळात एसटी महामंडळाला राज्य सरकारकडून पगारासाठी पैसे घेण्याची देखील गरज उरणार नसल्याची शक्यता महामंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे.

गडकरींचे व्हिजन

केंद्रीय मंत्री तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांच्या नव्या नव्या संकल्पनेला तोड नसते. एखाद्या कार्यक्रमात राजकारणावर नसती बडबड करण्याचे ते टाळतात तर फॉरेनमध्ये काय चालले आहे आणि आपला देश कुठे आहे? याचे चिंतन त्यांच्या भाषणातून असते. १९९५मध्ये राज्यात भाजपा-शिवसेना युतीचे सरकार आल्यानंतर सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून पुणे-मुंबई हायवे आणि इतर रस्त्यांची कामे करून गडकरी यांनी आपली किमया दाखवली होती. त्यांना गंमतीने गडकरी ऐवजी रोडकरी असे त्यावेळी संबोधले गेले होते. आताही केंद्रात मंत्री म्हणून काम करताना परिवहन क्षेत्रात मोठे बदल घडवून आणले. आपल्या खात्यातील अधिकाऱ्यांविरुद्ध स्पष्टपणे बोलणारे गडकरी हे एकमेव मंत्री असावेत.कारण हात स्वच्छ. आता गडकरी यांनी पश्चिम विदर्भातील खारे पाणी गोड करण्याची संकल्पना मांडली आहे. पर्यावरण प्रेमींमध्ये हा एक चर्चेचा विषय झाला आहे. गडकरींचा खारपाणपट्ट्यातील हा प्रयोग आहे. बंधारा आणि खोल तलाव बांधून खारे पाणी गोड्या पाण्यात रूपांतरित करण्याचा हा प्रयोग यशस्वी ठरणार का? असा प्रश्न पर्यावरणप्रेमींच्या मनात निर्माण झाला आहे. पश्चिम विदर्भातील पूर्णा नदीच्या दोन्ही तीरांजवळील सुमारे ४७०० चौ.कि.मी. क्षेत्र खारपाणपट्ट्यात मोडते. अमरावती, अकोला आणि बुलढाणा या तीन जिल्ह्यांतील १७ तालुक्यांमध्ये खारे पाणी आहे. भूगर्भातील पाणी सिंचन तसेच पिण्यासाठी अयोग्य आहे. शेतकऱ्यांना बागायती शेती करता येत नाही. पिण्याच्या पाण्याचे स्रोत कमी असल्याने पाणीपुरवठा योजनांवरही मर्यादा आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर गडकरी यांच्या पुढाकाराने बोराळा या गावात दीड कोटी रुपये खर्चाचा प्रायोगिक प्रकल्प राबविण्यात येत आहे. बंधारा आणि खोल तलाव बांधून खारे पाणी गोड्या पाण्यात रूपांतरित करण्याचा हा प्रयोग आहे. भूगर्भशास्त्रज्ञ सुरेश खानापूरकर यांच्या मार्गदर्शनात दर्यापूर तालुक्यातील बोराळा या गावातील नाल्यावर बंधारा बांधून शेजारी ८५ मीटर बाय ८५ मीटर बाय १३ मीटर असे मोठे शेततळे खोदले जात आहेत. या तळ्यात ९ कोटी ४० लाख

लिटर पावसाचे पाणी अडवण्याची योजना आहे. या ठिकाणी जमिनीखालच्या पहिल्या वाळूच्या थरातील खारट पाणी बाहेर काढून तेथे पावसाचे गोडे पाणी अडवून जिरवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यातून जमिनीत असणारा खारपटपणा सौम्य करणे म्हणजेच पाणी गोड करणे या प्रकल्पात अंतर्भूत आहे. आगामी काळात या प्रायोगिक प्रकल्पाची फलश्रुती लोकांसमोर येऊ शकेल. अकोला, अमरावती आणि बुलढाणा जिल्ह्यातील एकूण ४.६९ लाख हेक्टर खारपाणपट्ट्यातील जमिनींवर ९४० बंधारे बांधले, तर ४.६० लाख हेक्टर जमिनीला गोड पाणी बाराही महिने भरपूर प्रमाणात मिळू शकेल. एका बंधाऱ्याला २ कोटी रुपये खर्च येणार आहे. संपूर्ण कामासाठी २ हजार कोटी रुपये खर्च येईल. या पूर्ण प्रकल्पात मोठ्या प्रमाणात भूसंपादन नाही, स्थलांतर नाही तसेच पुनर्वसनही नाही त्यामुळे खर्च कमी असेल. प्रकल्पामुळे खारपाणपट्ट्यातील गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमचा निकाली निघेल व शेतीसाठीही मुबलक प्रमाणात गोड पाणी उपलब्ध होईल. प्रकल्पात वाळूच्या थरातून उपलब्ध होणारे खारे पाणी शेततळे करून साठवले, तर त्यात मत्स्य व्यवसाय सुरू करता येईल, ज्याचा शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होऊ शकतो, असा दावा करण्यात आला आहे. खारपाण पट्टा विकास मंडळाच्या वतीने ११ एप्रिल २००० रोजी खारपाणपट्टा उच्चाधिकार समितीची स्थापना करण्यात आली होती. या समितीने अभ्यास करून आपला अहवाल सादर केला होता. त्यानंतर २००७ मध्ये समस्यांवर उपाय शोधण्यासाठी शासनाच्या वतीने तत्कालीन राज्यमंत्री वसुधा देशमुख यांच्या नेतृत्वाखाली एका समितीची स्थापना करण्यात आली होती. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठानेदेखील संशोधन केले. 'पोकरा' प्रकल्पातून काही कामे करण्याचा प्रयत्न झाला, त्या प्रकल्पाचा विस्तार करून आता साडेचार हजार कोटींचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पदेखील राबविण्यात येत आहे. पण, अजूनही ठोस उत्तर मिळालेले नाही. आखाती देशांमध्ये समुद्राचे खारे पाणी गोड करण्याचे शेकडो प्रकल्प आहेत. सिंगापूरमध्ये शहरातील सांडपाणी शुद्ध करून पुरवले जाते. लोकांनी आपल्या भागाचा विकास समजून घेतला पाहिजे. राजकारण्यांचे ऐकून विरोध होत राहिला तर आपल्याच पायावर धोंडा पडणार आहे. नवीन एखादी गोष्ट अवघड वाटते पण अशक्य नाहीच. केवळ विदर्भातच नाही तर राज्यात अनेक ठिकाणी नदी काठी खारे पाणी आहे. त्याचाही प्रत्येकांनी विचार केला पाहिजे.

शैक्षणिक जगत

स्पर्धा परीक्षांची बिकट वाट

स्पर्धा परीक्षांमधील यशाला गवसणी घालण्यासाठी विद्यार्थ्यांची कष्ट उपसण्याची तयारी असते. पालकही मुलांच्या मनात असलेल्या स्वप्नाला बळ देण्याचे काम करतात. त्या बळातूनच भविष्याच्या स्वप्नांची पेरणी होते. त्या स्वप्नांचा पाठलाग करताना यशाचे प्रमाण फारसे नाही. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या निकालावर नजर टाकली तर अवघा एक टक्का विद्यार्थीदेखील पात्र ठरत नाहीत आणि ९९ टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थी नापास होतात.

उच्च शिक्षणातील विविध शाखांतील पदवी धारण केल्यानंतर अनेक मुले स्पर्धा परीक्षांसाठी अनेक वर्षे प्रयत्न करतात. त्या प्रयत्नात कोणाला तात्काळ यश मिळते तर कोणाला यशासाठी दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागते. येथील स्पर्धा परीक्षांमधून मिळणारे यश प्रकाशमान असते अशी समाज मनाची धारणा आहे. स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून मिळणाऱ्या यशाला प्रतिष्ठा आणि समाजमान्यता आहे. या स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून भरल्या जाणाऱ्या पदांच्या जागा शेकड्यात आणि उमेदवार लाखांत असतात. हे अत्यंत विरोधाभासी चित्र आहे. तीव्र स्पर्धा असल्याने विद्यार्थी झपाटून अभ्यास करतात. यशाला गवसणी घालण्यासाठी कष्ट उपसण्याची तयारी असते. पालकही मुलांच्या मनात असलेल्या स्वप्नाला बळ देण्याचे काम करतात. त्या बळातूनच भविष्याच्या स्वप्नाची पेरणी होते. त्या स्वप्नाचा पाठलाग करताना यशाचे प्रमाण फारसे नाही. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या निकालावर नजर टाकली तर अवघा एक टक्का विद्यार्थीदेखील पात्र ठरत नाहीत आणि ९९ टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थी नापास होतात.

आयुष्यातील २०-२५ वर्षे पदवी, पदव्युत्तर शिक्षणासाठी खर्च होतात. त्यानंतर स्पर्धा परीक्षेसाठी तयारी सुरू होते. पुन्हा दोन पाच वर्षे परीक्षा, मुलाखती, निवड प्रक्रिया, नियुक्ती यात सहज वर्षे निघून जाते. तरीही विद्यार्थी स्पर्धा परीक्षेचा पाठलाग करणे सोडत नाहीत. या स्पर्धेत लाखो मुलांना यश मिळत नाही. अनेक विद्यार्थ्यांचे स्वतःला आजमावणे घडत राहते. अनेकदा अपयश मिळूनही प्रयत्न सुटत नाहीत. सरकारी नोकरीचे मोठे आकर्षण विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांना असते. सरकारी नोकरीचे आकर्षण का? मुळात सरकारी नोकरी ही समाजसेवेची उत्तम संधी आहे. त्या संधीचे सोने करणारी माणसंही या व्यवस्थेत आहेत आणि मिळालेल्या संधीने स्वतःच्या अनेक पिढ्या जगू शकतील अशा दिशेचा प्रवास करणारी माणसंही या व्यवस्थेने अनुभवली आहेत. यातील कोणता प्रवास विद्यार्थ्यांना आकर्षित करतो? का करतो? याचा शोध घ्यायला हवा. स्पर्धा परीक्षेची वाट चालत राहिलो तर भविष्य अत्यंत चांगले आहे अशी साधारण धारणा आहे. त्या वाटेचा प्रवास समाज उद्धाराचा आणि स्वतःला उन्नत करणारा आहे. यातही निर्मळ वाटेने चालणाऱ्या माणसांचा शोध घ्यावा लागतो आणि शोधतानाही माणसं सापडणे दिवसेंदिवस कठीण बनत आहे.

स्पर्धा परीक्षेशिवाय इतरत्र जीवन आनंदी करणाऱ्या वाटा नाहीत का? स्वतःच्या उन्नतीकरणासाठी स्वतःच्या हाती असणाऱ्या कौशल्यांच्या वाटा चालणे का घडत नाही? स्वयंरोजगाराच्या वाटा खुणावत असूनही आणि आपल्या हाती उत्तम कौशल्य असतानादेखील त्या कौशल्यांचा पुरेपूर उपयोग करणारी व्यवस्था निर्माण करण्यात मन रमत नाही. त्या दिशेने प्रवास घडत मात्र नाही. इतकी मुले स्पर्धा परीक्षांची तयारी करताना त्यासाठी लागणारी क्षमता किती विद्यार्थ्यांमध्ये आहे? याचा विचार केला जातो का? खरेतर ज्या पदासाठी उमेदवार हवा आहे, त्यासाठी लागणारी क्षमता केवळ एखाद्या परीक्षेतून मापली जाणे शक्य आहे का? नियुक्ती केल्यानंतर क्षमता प्राप्त करणे शक्य आहे का? असल्यास किती प्रमाणात ते साध्य होते? किती प्रमाणात प्रशासनात नवनवीन प्रयोग केले याचा विचार केला तर बहुतांश उत्तरे नकारात्मक येतात.



ग्रामीण भागातील विद्यार्थी जेव्हा स्पर्धा परीक्षेचा मार्ग निवडतात त्यामागे आंतरिक प्रेरणेचा भाग किती? हा प्रश्न आहे. पदवी धारण केल्यावर नोकरीचा शोध सुरू होतो. ग्रामीण भागात नोकऱ्यांचे प्रमाण तसे फारसे नाही. ग्रामीण भागात स्वातंत्र्यानंतर विकासाची चाके गतीने फिरली नाहीत. शेती हाच आजही खेड्यांच्या केंद्रस्थानी राहिलेला व्यवसाय आहे. त्यावर आधारित उद्योगाची चाके फिरली नसल्याने तरुणांना नोकरीचेच आकर्षण अधिक आहे. ग्रामीण भागातील तरुणांना मिळेल तेथे कमी आर्थिक उत्पन्नात काम करावे लागते. त्यामुळे किमान पदवी धारण केलेल्या तरुणाईला स्पर्धा परीक्षेचा मार्ग दाखविला जातो. मुलांना तो मार्ग अधिक जवळचा आणि योग्य वाटतो. त्यासाठीची तयारी पदवीनंतरच सुरू होते. स्पर्धा परीक्षेसाठीचा कोणताही पाया शालेय अथवा महाविद्यालयीन शिक्षणात यातला गेलेला नसतो. त्या दृष्टीने विद्यार्थ्यांना मार्गही सापडत नसतो. स्पर्धा परीक्षेसाठी महानगराकडे जाण्याचा मार्ग दिसू लागतो. तेथे जाऊन शिकवणी सुरू होते. आर्थिक संकट असले तरी मनात पेरलेली स्वप्न शांत बसू देत नाहीत.

आईवडील पोटाला चिमटा घेत पैसे पुरवतात. एकीकडे महानगरात राहायचे, भोजन, निवास, शिकवणीसाठीचा मोठा खर्च करायचा. त्या खर्चानंतरही अपेक्षित यश न मिळाल्याने अनेक विद्यार्थ्यांना पुन्हा घरची वाट धरावी लागते. मनात निराशेचे घर अधिक भक्कम झालेले असते. त्या निराशेतून मार्ग सापडणे कठीण बनते. मग मिळेल तेथे नोकरीचा मार्ग स्वीकारला जातो आणि मनी उच्च अधिकारी पदाच्या स्वप्नांची राखरांगोळी होते. असे कितीतरी विद्यार्थी आजही ग्रामीण भागात आहेत. महानगरात शिकवणी वर्गासाठी राहिल्याने आणि तेथे गरजेप्रमाणे सुविधा घेतल्याने घरच्यांवर कर्ज होते. त्यातून कौटुंबिक आर्थिक स्थिती खालावते. निराशेची छाया मनावर राज्य करते. या स्पर्धेतून यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबांची परिस्थिती सुधारते, मात्र इतरांना पुन्हा नव्या वाटा शोधाव्या लागतात.

मुळात आपल्या व्यवस्थेत ज्याला प्रतिष्ठा असते त्या दिशेने गर्दी अनुभवास मिळते. सरकारी नोकरीत एक प्रकारची प्रतिष्ठा आहे. सरकारी अधिकारी, कर्मचारी यांना मिळालेले अधिकार, सरकारी पातळीवर असलेल्या पुरेशा प्रमाणातील सुविधा आणि सुरक्षा, नोकरी आणि वेतनाची असलेली हमी, त्यामुळे सरकारी नोकरीचे मोठे आकर्षण समाजातील सर्वच घटकांना आहे. त्यामुळे सरकारी वेतन घेणारा माणूस कोणत्याही पदावर असला तरी त्याची सामाजिक उंची अधिक मानली जाते. आर्थिक स्तरात सुधारणा झालेली पाहावयास मिळते. त्यात येथे श्रमाची कामे कमी आणि बौद्धिक काम अधिक असते असे मानले जाते. ही पदे जनसेवेची आणि समाजपरिवर्तनाची सर्वाधिक प्रभावी पदे आहेत. या पदावरील माणसांनी ठरवले तर समाज जीवनात आनंदाचे वातावरण निर्माण करणे सहज शक्य आहे.

आपल्याकडे विद्यार्थी पदवीधर झाल्यानंतर त्याला स्पर्धा परीक्षांच्या वाटा दिसू लागतात. त्याने पदवी, पदव्युत्तर जे शिक्षण प्राप्त केले आहे, त्या शाखेच्या ज्ञानाचा लाभ त्याला भविष्याच्या वाटचालीसाठी होण्याची गरज असते. सरकारने त्या तरुणांच्या शिक्षणावर केलेला सरकारी खर्च हा जनतेच्या कराचा पैसा असतो. त्यामुळे त्या ज्ञानाचा लाभ समाज व्यवस्थेलाही होण्याची गरज असते. त्यांनी ज्या क्षेत्राची पदवीधारण केली आहे त्या ज्ञानाचा उपयोग त्याच क्षेत्रात झाला तर ते क्षेत्र गतिमान आणि उन्नत होण्यास मदत होईल. तरुणांच्या ज्ञानाचा समाज व राष्ट्र उन्नतीकरिता उपयोग होण्याची गरज असते. आपल्याकडे अनुदानित शिक्षण व्यवस्थेवर सरकार खर्च करीत आहे. त्या खर्चातून आपल्याला विविध पदवीपात्र उमेदवार मिळतात. स्पर्धा परीक्षेत निवड झाल्यावर त्यांच्या पदवीच्या ज्ञानाचा कितपत उपयोग होतो, हा खरा प्रश्न आहे. वैद्यकीय पदवी, पदव्युत्तर शिक्षणातून आपल्या समाजाला उत्तम डॉक्टर मिळत असतात. ज्यांनी वैद्यकीय क्षेत्रात यश मिळविले आहे. त्यांनी स्पर्धा परीक्षेद्वारे वैद्यकीय क्षेत्रासाठी निवड झाली तर समजण्यासारखे आहे.

- संदीप वाकचौरे.

टुडेज् ब्लॉग

मराठी शाळांचे भवितव्य काय?

माझ्या आयनल गावचे क्रिकेटर आणि सध्या पोलीस दलात कार्यरत असणारे संदेश चव्हाण यांनी ११ जानेवारी, २०२३ रोजी मला मोबाइलवरील आयनल विकास मंडळाच्या ग्रुपवर संदेश पाठविला होता की, आपण असाच एक लेख ग्रामीण भागातील आपल्या जिल्हा परिषदेच्या शाळा आहेत, त्यांचा विद्यार्थी पट कमी होत चाललेला आहे. त्याची कारणे काय असू शकतात, याबाबत आपण अभ्यास करून त्याच्यावर प्रकाश टाकणारा एखादा लेख लिहिला तर खूप बरे होईल. आपण ज्या गावच्या शाळेत शिकलो त्या शाळा आता गावी गेल्यावर हरवलेल्यासारख्या वाटत आहेत. त्याचे खूप दुःख होत आहे.' खरंच ही वस्तुस्थिती आहे. आपल्या राज्यातील मराठी माध्यमाच्या शाळांचा अभ्यास केल्यास सध्या इंग्रजी माध्यमामुळे मराठी शाळांचे भवितव्य धोक्यात आले आहे. तेव्हा राज्यातील जिल्हा परिषदेच्या शाळा वाचविणे आपले सर्वांचे कर्तव्य आहे.

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षाच्या शाळा १५ मे पासून सुरू झाल्या आहेत. त्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यातील १२१ शाळांमध्ये शिक्षकच नाहीत, असे वाचनात आले. त्यात पट संख्येचा खेळखंडोबा मग राज्यातील मराठी शाळांचे भवितव्य काय? तेव्हा मराठी माध्यमांच्या

शाळा बंद पडणार नाहीत याची सर्वांनी काळजी घेतली पाहिजे. यातच मराठी शाळांचे भवितव्य आहे. शिक्षण क्षेत्रात सध्या शिक्षक सेवक म्हणून अगदी तीन वर्षे मानधनावर काम करावे लागते. रुपये तीन हजारांचे आता रुपये आठ हजार झाले तरी त्यांचे भवितव्य काय? हा खरा प्रश्न आहे. त्यांची पात्रता एच. एस. सी., डी. एड. असून बऱ्याच ठिकाणी एम. ए. झालेले शाळेतील फलकावर त्यांच्या नावाच्या समोर वाचायला मिळतात. त्यात कायम विनाअनुदानित शाळांचे वाढते प्रमाण लक्षात घेता अध्यापक पदवीला काहीच किंमत नाही असे वाटते. वास्तविक ते सेवेत रुजू झाल्यापासून पूर्ण वेतनी पगार दिला गेला पाहिजे. सध्या इंग्रजी माध्यमांच्या शाळांमुळे मराठी शाळांच्या पटसंख्येवर त्याचा परिणाम झालेला दिसतो. तेव्हा मराठी शाळांचे भवितव्य काय असा प्रश्न निर्माण होतो. सध्या हा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. जर शाळा बंद पडत असतील, तर त्यांचे भवितव्य काय? असा प्रश्न निर्माण होतो.

एक वेळ गजबजलेल्या मराठी शाळा आता ओस पडतात की काय, असा प्रश्न निर्माण होत आहे. अलीकडे पट संख्येचा प्रश्न आल्याने ज्या ठिकाणी वीसपेक्षा कमी मुले आहेत, अशा शाळांसमोर टांगती तलवार होती. मात्र जागृत पालक वर्गामुळे शिक्षण विभागाला नमती बाजू घ्यावी लागली. अन्यथा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ८३५ शाळा बंद पडल्या असत्या. तुटपुंज्या पगारामुळे अर्धपोटी किती दिवस राहणार आणि अध्यापन करणार? याचा विचार राज्यातील शिक्षण विभागाने करणे राज्याच्या हिताच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. तेव्हा कोकणचे सुपुत्र व शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर हे मातृभाषेवर भर देऊन येत्या काळात मराठी शाळांना चांगले दिवस आणतील, अशी अपेक्षा करूया !

- रवींद्र तांबे.

जन्म हा अखेरचा

प्राणानुग्रहस्थल - १

त्याप्रमाणे दररोज प्राणाचे २१६०० धक्के खाऊन आपले हृदय प्रतिक्षणी दुबळे होत असते. अखेर ते इतके दुबळे होते की एका क्षणी आपले कार्य थांबवते. म्हणून जे प्राणावर नियंत्रण करु शकत नाहीत ते अल्पायुषी ठरतात आणि जे प्राणावर नियंत्रण ठेवतात ते दीर्घायुषी होतात. परमेश्वराने प्रत्येक मनुष्याला शंभर वर्षांचे आयुष्य दिलेले आहे. परंतु काही लोक ४०व्या वर्षी तर काही ६०व्या वर्षी मरण पावतात. क्वचित एखादा शंभरी गाठतो. योगी लोक शेकडो आणि हजारो वर्षे जीवंत राहतात. शरीर एकच आहे मग एखादे शरीर वर्षानुवर्षे जीवंत कसे राहते? प्राण आपल्या जीवनाचा आधार आहे. सामान्य माणूस भरभर श्वास घेऊन आपले आयुष्य संपवून टाकतो तर योगी मात्र श्वासाचे नियमन करुन आपले श्वास वाचवतो. हे बँकेमध्ये फिक्स डिपॉझिट ठेवून त्याच्या व्याजावर उदरनिर्वाह करण्यासारखे आहे. पैसा कसा वाचवावा, याचे आपल्याला ज्ञान असते. परंतु श्वास कसे वाचवावेत आणि आयुष्य कसे वाढवावे, याचे ज्ञान मात्र नसते. दहा वेळा भरभर श्वास घेण्याऐवजी जर एकच दीर्घ श्वास घेतला तर श्वाससंख्या मर्यादित करता येते. हेच प्राणायाम प्रक्रिया आपल्याला सांगत असते.

सहज एका मिनिटात आपण किती श्वास घेतो आणि आसनावर नीट बसून ॐकार ध्वनी करत किती श्वास घेतो, हे पडताळून पाहा. तुम्हाला आढळून येईल की सहज तुम्ही जेवढे श्वास घेता, त्यापेक्षा ॐकार ध्वनीसहित तुम्ही कमी श्वास घेता. अशाप्रकारे योगी श्वासाची बचत करतात आणि एका श्वासातल्या प्राणाचा अधिकाधिक उपयोग करुन घेतात. वाढणे हा प्राणाचा स्वभाव आहे. तुम्ही श्वास घेऊन जर आत रोधून धरला तर थोड्या वेळाने हृदयात खूप काही वाढले आहे अशी जाणीव तुम्हाला होऊन श्वास केव्हा बाहेर सोडतो आणि केव्हा नाही, असे तुम्हाला होईल. श्वास घेताना एवढा त्रास होत नाही. परंतु आत कोंडल्यावर तो वाढतो. त्याला ठेवण्याइतकी जागा आपल्या फुप्फुसात नसते. म्हणून आपण घाईघाईने तो बाहेर सोडतो. प्राण रोधून ठेवल्यानंतर वाढलेल्या प्राणाचा कसा उपयोग करुन घ्यावा हे योगी लोकांना माहीत असते. योग्याला आणि भोग्याला परमेश्वराने सारखीच श्वाससंख्या दिलेली असते. परंतु भोगी भरभर श्वास घेऊन आपले आयुष्य घटवतो तर योगी कमी श्वास घेऊन आपले आयुष्य वाढवतो.

प्राणाच्या पूरक आणि रेचक या वृत्तींना शांत करावे, असे या श्लोकात सांगितले आहे. **(क्रमशः) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

ऑनलाइन गेम्सवर बंदी अपेक्षित आहे

जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेल्या आपल्या देशाकडे विदेशातील कंपन्या, व्यावसायिक आपले मोठे गिऱ्हाईक म्हणून पाहत असतात. फॅशन, औषधे, वाहने, तंत्रज्ञान इत्यादींना भारतीय बाजारपेठेत मोठा वाव मिळतो. तसाच मोबाईल बनविणाऱ्या कंपन्यांनी आपली मार्केटिंग तंत्रे वापरून भारतात करोडो मोबाईल्सची विक्री साधली आहे. त्या विक्रीचा फायदा घेऊन खरेदी विक्रीसारख्या अर्थव्यवहारांत, बँकिंग क्षेत्रात, अब्जावधी रुपयांचे व्यवहार होतात. तसेच ऑनलाईन खेळ म्हणजेच गेमिंग ज्यांची २०१२ मध्ये १५ अब्जांची उलाढाल होत होती ती २०२२ मध्ये १३५ अब्ज रुपयांवर पोहोचली आणि सन २०२५ पर्यंत २३५ अब्जांचा टप्पा पार पाडेल, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. पूर्वीपासून लोकांना लॉटरी हा प्रकार चांगलाच ठाऊक आहे, तो जसा एक जुगाराचा भाग म्हणून ओळखला जातो.

आपल्या देशातील लोकसंख्येत तरुणांची संख्या अधिक आहे. त्यामुळेच ऑनलाईन गेम्स हे खासकरून तरुण वर्गाची मानसिकता हेरून किव्येक ऑनलाईन गेमिंग कंपन्यांनी आपल्या खेळांचे ॲप्स बाजारात आणून तरुणांना अक्षरशः वेड लावले आहे. मागील काळात पब्जी, टिक टॉक सारख्या गेम्सनी लोकांना वेड लावून धुमाकूळ घातल्यावर त्यांवर बंदी आणणे भाग पडले. तसेच काहीसे प्रकार घरबसल्या मोबाईल्स वरून ऑनलाईन गेम्स खेळण्याची सोय सादर करून दिले आहेत. त्या गेम्ससाठी परवाने, खेळांच्या पध्दतीचा शहानिशा न करता सर्रास गेम्सच्या जाहिराती, बक्षिसांच्या मोठमोठ्या रक्कमा जाहीर करून तरुण वर्गाला भुलविले जात आहे. सुरुवातीला नवीन नवीन प्स, सादर केल्यावर त्यांच्या पुढच्या आवृत्त्या, पुढची टास्कस् , वाढती बक्षिसे अशा आकर्षणांनी तरुणांची बँक खाती, शिल्लक रिकामी केली जात आहेत. मनोरंजनाच्या ह्या खेळांत गेमिंग

कंपन्यांव्यतिरिक्त सरकारी तिजोरीत किती कर जमा केला जातो याची माहिती उपलब्ध करून देणे कंपन्यांना अनिवार्य केले जावे. जरी सरकारी तिजोरीत मनोरंजनाच्या नावाखाली कर म्हणून करोडो रुपये जमा होत असतील तर तंत्रज्ञानाचा वापर देशातील तरुणवर्गाला भुलविणे किंवा तरुणांच्या बुध्दीचा भेद करण्यासाठी केला जातोय हे कितपत योग्य आहे याचा विचार कोणी करायचा? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

- राजन पांजरी, जोगेश्वरी.

महिला आणि गुंतवणूक

आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे आपल्याला हवे तेव्हा पैसे खर्च करता येणे आणि पैशांसाठी कोणावरही अवलंबून न राहावे लागणे असे ढोबळमानाने म्हणता येईल. त्यानुसार बहुतेक गुंतवणूक निर्णय घेतले जातात. मात्र, असे निर्णय हे बहुधा घरातील पुरुष सभासदाकडून घेतले जातात आणि कागदपत्रांवर महिला डोळे मिटून सह्या करतात. त्यात अनेकदा त्यांना ही काय कटकट, असेही वाटत असते. अनेकदा अशी गुंतवणूक करणाऱ्या गुंतवणूकदारासही अगदी जुजबी माहिती असते. खरे ते हे निर्णय एकमेकांच्या मतांचा आदर करून पारदर्शक पद्धतीने घ्यायला हवेत.

मोजकेच गुंतवणूक सल्लागार त्यांचा गुंतवणूक सल्ला घेण्यासाठी जोडीदारासह किंवा अविवाहित गुंतवणूकदारांना त्याच्या आईसह घेण्यास सांगतात. योजना समजावून सांगून शंकांचे निराकरण करतात. काही प्रश्नावली भरून घेऊन त्यांची धोका घेण्याची क्षमता अजमावून घेतात. ही एक आदर्श पद्धत आहे. खर तर गुंतवणूक करण्यासाठी लागू असलेले नियम स्त्रिया आणि पुरुष यांच्यासाठी वेगळे नाहीत.

पुरेसा इन्शुरन्स घेणे : आपण घेतलेले कर्ज आणि त्यात आपल्या वार्षिक उत्पन्नाच्या २० पट रक्कम मिळवून देणाऱ्या रकमेचा इन्शुरन्स घेणे आवश्यक आहे. असा इन्शुरन्स टर्म इन्शुरन्स याच प्रकारात मोडतो. टर्म इन्शुरन्स हा आपण किती वर्षे कार्यरत राहू याचा विचार करून तेवढ्याच कालावधीचा घ्यावा. अन्य कोणत्याही योजना प्रकारातील विमा आपली पूर्ण गरज भागवू शकत नाही. त्याचप्रमाणे प्रीमियम परत मिळणारा बोनस मिळू शकणारा टर्म इन्शुरन्स घेऊ नये कारण त्याचा प्रीमियम अधिक असतो. नियमित प्रीमियम भरून योजना चालू ठेवावी.

पुरेसा आरोग्यविमा घेणे : आपण कुठे राहतो या परिसराचा विचार करून वार्षिक उत्पन्नाच्या ३ ते ५ पट आरोग्यविमा घेता येईल. याचे प्रीमियम आजकाल खूप वाढले असून व्यक्तिगत विमा घेण्याऐवजी कुटुंबाचा एकत्रित विमा घेणे किफायतशीर आहे. प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष शेअरबाजारातील गुंतवणूक यातून महागाईवर मात करणारा परतावा मिळू शकत असल्याने, आपल्या स्वप्नपूर्तीसाठी लवकरात लवकर गुंतवणूक करण्यास सुरुवात करावी. गुंतवणूक दोन्ही प्रकारात स्वतः अथवा सल्लागाराची मदत घेऊन करता येईल.

गुंतवणूक विविध प्रकारात विभागावी : गुंतवणूक विविध मालमत्ता प्रकारात विभागून दीर्घ काळासाठी केल्यास त्यातील धोक्याची तीव्रता कमी होते.

स्थावर मालमत्तेमधील गुंतवणूक : अशी गुंतवणूक हा कदाचित आतबट्याचा व्यवहार ठरू शकतो. त्याऐवजी रिटस आणि इनवीट या आधुनिक पर्यायांचा विचार करावा.

सोन्यातील गुंतवणूक : अशी गुंतवणूक दागिन्यांच्या स्वरूपात न करता शुद्ध स्वरूपात करावी. यासाठी डिजिटल गोल्ड, इजिआर हे आधुनिक पर्याय उपलब्ध आहेत, त्याचप्रमाणे सरकारकडून हमी असलेले सुवर्ण सार्वभौम रोखे हे नियमित उत्पन्न देणारे आणि

आयकरात काही सवलती देणारे आहेत त्यांचा अवश्य विचार करता येईल. याशिवाय पारंपरिक बचतीच्या पर्यायांचा वापर गरजेनुसार करता येईल. या सर्वांना लागू असणाऱ्या प्राथमिक गोष्टी आहेत. यातील एक अथवा अनेक प्रकार एकत्र करून आपले गुंतवणूक धोरण ठरवून वेळोवेळी त्याचा आढावा घेता येईल. किमान ५० लाख गुंतवणूक करू शकणारे गुंतवणूकदार गुंतवणूक संच व्यवस्थापन करणाऱ्या (पीएमएस) तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन घेऊ शकतात आणि आपली गुंतवणूक अधिक चांगली करू शकतील किंवा स्वतः अभ्यास करूनही गुंतवणूक करू शकतील. यात स्त्री की पुरुष असा कोणताही भेदभाव नाही. फक्त स्त्री म्हणून आपण आपला आणि कुटुंबाचा विचार करून गुंतवणूक करणार असाल तर काही गोष्टी ध्यानात ठेवाव्यात.

आपल्या आणि जोडीदाराच्या (जोडीदार असल्यास) उत्पन्नाचा अंदाज घ्या. उत्पन्न आणि जबाबदाऱ्या यांचा विचार करा. विवाहाचा विचार असल्या/नसल्याच्या शक्यतांचा, त्यातून निर्माण होणारे प्रश्न यांचा विचार करा. भारतातील स्त्रियांचे आयुर्मान पुरुषांहून अधिक आहे. याद्दीने भविष्याचा विचार करा. कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे महिलांचे अनेकदा करिअरकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. यातून काही मानसिक समस्या उद्भवण्याची शक्यता असते. जास्त जगण्याची शक्यता म्हणजे निरोगी जगण्याची हमी असे नाही. वयानुसार आजार मागोमाग येतील याचा विचार करा. जितक्या सहजतेने आपण अन्य गोष्टी खरेदी करतो, तपासून पाहतो. दर्जा आणि दर याची तुलना करून कोणती वस्तू सुयोग्य ते ठरवतो त्याचप्रमाणे गुंतवणूक करा. स्त्रिया मनात आणल्यास पुरुषांहून अधिक वेगवेगळ्या शक्यतांचा विचार करू शकतात.ज्ञानातील गुंतवणूक ही सर्वश्रेष्ठ गुंतवणूक : यासंबंधी अधिकाधिक ज्ञान मिळवणे आवश्यक असून त्यासाठी काही रक्कम खर्च करण्याची तयारी ठेवावी. महिलांचा गुंतवणूक दृष्टिकोन जाणून घेण्यासाठी दोन वर्षांपूर्वी 'ग्रोव्ह' या गुंतवणूक पोर्टलमार्फत एक सर्व्हे घेण्यात आला. यात अडीच लाख महिलांना प्रश्नावली पाठवण्यात आली. त्यातील २८००० महिलांनी प्रश्नावली भरून सहभाग घेतला. एवढ्या कमी सहभागातून खात्रीपूर्वक सार्वत्रिक निष्कर्ष काढता येणार नाहीत तरी मिळालेले प्रतिनिधिक निष्कर्ष असे आहेत. तेव्हा महिलांनो, अर्थसाक्षर व्हा, गुंतवणूक वाढवा, स्वावलंबी व्हा!

- उदय पिंगळे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळवे यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०

गिरीजा शिंदे नीट परीक्षेत जिल्ह्यात प्रथम

अक्कलकोट : येथील के.एल.ई संचलित मंगरूळ प्रशालेचे माजी विद्यार्थीनी गिरिजा शिंदे हिने निट परीक्षेत ५२० पैकी ६८५ गुण मिळवून जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविल्याने तिच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचे वर्षाव होत आहे. मंगरूळे प्रशालेच्या माजी विद्यार्थीनी गिरीजा शिंदे हिने निट परिक्षेत ५२० पैकी ६८५ गुण मिळवून जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकाविले. तर वर्षा प्रचंडे हिने ५२० पैकी ५३६ गुण, नागनाथ कुंभार यांने ५२०. पैकी ५३५ गुण मिळवून निट परिक्षेत उत्तीर्ण झाले आहे. या तीन्ही विद्यार्थ्यांचे प्रशालेच्या वतीने शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. उपस्थित वर्ग शिक्षकांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक एन.एस. कदम बोलताना म्हणाले की, गिरीजा शिंदे हिने नेहमीच शाळेची उपस्थिती लावून शिक्षकांनी शिकवलेल्या अध्यापन लक्ष देऊन ऐकणे, आणि वायपट वेळ न यालवता अभ्यास करीत होती. त्याचेच प्रतिफल असून प्रशालेतील सर्व विद्यार्थ्यांनी गिरीजा शिंदे हिचा आदर्श घ्यावे असे आवाहन कदम यांनी केले.या प्रसंगी व्यासपिठावर मुख्याध्यापक एन.एस. कदम, उपमख्याध्याप एम.वाय. पाटील, पर्यवेक्षिका आरती तोळणूरे आदी उपस्थित होते. यशस्वी विद्यार्थीनीचे पर्यवेक्षीका आरती तोळणूरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी प्रशालेचे शिक्षक एम.एम. कळसगोंडा, आर.बी.उमाटे, पी.एम. पाटील, एन.व्ही. दिंडोरे आदी शिक्षक, शिक्षिका, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व अभार जयंत उपासे यांनी केले.

प्रथमेश इंगळे यांचा स्विमिंग ग्रुपच्यावतीने सत्कार

अक्कलकोट : शाळा शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये अध्यापनाचे अविरत गोडी असले पाहिजे. तरच स्पर्धात्मक युगात शिखर सर करता येतो, असे प्रतिपादन उद्योगपती सचिन किरनळळी यांनी केले. ते स्विमिंग ग्रुप अक्कलकोटच्या वतीने आय.एम.एस. प्रशालेत प्रथम क्रमांक पटकाविलेले वटवृक्ष देवस्थाने अध्यक्ष महेश इंगळे यांचे पूत्र प्रथमेश इंगळे याचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाध्ये प्रमुख पाहुणे म्हणून किरनळळी हे बोलत होते. पुढे बोलताना म्हणाले की, सध्या स्पर्धात्मक युग आहे. यामुळे प्रत्येक क्षेत्रात स्पर्धा वाढलेले आहे. शिक्षणामध्ये अनेक पर्यायी उपलब्ध आहेत. ऐच्छिक असलेल्या भागात जाण्यासाठी जिद्दीने, चिकाटीने अध्यापन करणे काळाची गरज आहे. त्याचे गरज ओळखूनच प्रथमेश इंगळे यांनी इ. १२ वी मध्ये प्रशालेत प्रथम क्रमांक पटकाविला आहे. त्याचे गुणगौरव करण्यासाठी अक्कलकोट स्विमिंग ग्रुपच्या वतीने सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देत आहे, असेच इतर संघटणात्मक कार्य करणाऱ्या सर्व संस्थापक व संचालकांनी गुणवंताचा सन्मान करून शाबासकीचे थाप द्यावे असे आवाहन सचिन किरनळळी यांनी केले. या प्रसंगी वटवृक्ष देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे, स्विमिंग ग्रुपच्या उपाध्यक्ष संतोष पराणे, श्रीकांत झिपरे, बाळासाहेब एकबोटे, चंद्रकांत सोनटक्के, राजकुमार एकबोटे, अरविंद पाटील, हणमंत माळी, लक्ष्मीकांत पराणे, मल्लिनाथ माळी, महादेव अडवितोटे आदीजण उपस्थित होते.

'एमएचटी-सीईटी'त दयानंदचा सरसंबे प्रथम

सोलापूर : २०२३ मध्ये घेण्यात आलेल्या एमएचटी-सीईटी - २०२३ या परीक्षेचा निकाल उपलब्ध झाला आहे. समर्थ शिवानंद सरसंबे हा विद्यार्थी ९९.४८ % गुण मिळवून पीसीबी ग्रुपमध्ये प्रथम आला आहे तर शुभम आनंद कटकधोंड हा विद्यार्थी पीसीएम ग्रुपमध्ये ९५.०८ % गुण मिळवून महाविद्यालयात सर्वप्रथम आला आहे. प्रजिता प्रफुल्ल शेट्टी ही विद्यार्थिनी ९६.९३ % गुण मिळवून पीसीबी ग्रुपमध्ये व्दितीय आली आहे. अन्नपूर्णा बालाजी नागेल्ली ही विद्यार्थिनी ९६.८२ % गुण मिळवून पीसीबी ग्रुपमध्ये तृतीय आली आहे. शिवराज सिध्दाराम जावळे हा विद्यार्थी पीसीएम ग्रुपमध्ये ९३.९९ % गुण मिळवून व्दितीय आला आहे. प्रफुल्ल ज्योतिबा जाधव हा विद्यार्थी पीसीएम ग्रुपमध्ये ९२.८३ % गुण मिळवून तृतीय आला आहे. त्रिशा किरण बोल्लू (पीसीबी-९५.३७%), प्रशांत नागप्पा उमराणी (पीसीबी-९१.४०%), ऋषभ लिंगराज जोरीगल (पीसीएम-९१.२६%), अविराज सदाशिव चिलगुंडे (पीसीएम-९०.४५%), ओम नागेंद्र हिप्परगी (पीसीबी-९०.५४%), उत्कर्ष रामदास खवेकर (पीसीएम-९०.२९%), अन्नपूर्णा बालाजी नागेल्ली (पीसीएम-९०.२९%), कु. ओहोळ मोहित मोहन (पीसीएम-९०.१९) याशिवाय इतर अनेक विद्यार्थ्यांनी यवयवीत यश संपादन केले आहे.दयानंद शिक्षण संस्थेचे स्थानीय सचिव डॉ. महेश चोप्रा, संस्थेचे प्रशासक डॉ. विजयकुमार उबाळे, दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एच. दामजी, उपप्राचार्य अरुण खांडेकर, पर्यवेक्षक विजय बिराजदार, समन्वयक माधव कुलकर्णी व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

दोन महिन्यांनी शाळेत सुरु झाला पुन्हा किलबिलाट

औक्षण केले, मिठाई वाटली,बॅण्डच्या निनादात विद्यार्थ्यांचे स्वागत

सुराज्य/सोलापूर

तब्बल दोन महिन्याच्या उन्हाळी सुटीनंतर गुरुवारी शाळांची घंटा वाजली. मुलांच्या गर्दीने वर्ग गजबजल्याने एकच किलबिलाट सुरू झाला. शाळेत पहिल्यांदाच येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये हुरहुर आणि उत्साह दिसून आला. काही विद्यार्थ्यांना रडूही कोसळले. दरम्यान, काही शाळांनी पुष्पवृष्टी करून तर काही ठिकाणी औक्षण करून व मिठाई वाटप करून विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत केले. तर काही शाळांत बॅण्डच्या निनादात विद्यार्थ्यांचे स्वागत केले. मिठाई चॉकेलट टांगा सफर असे विविध प्रकारे मुलांचा शाळेत प्रवेश घडवून आणला

पहिल्याच दिवशी शाळांचा परिसर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने गजबजून गेला होता. शाळेत पहिल्यांदाच दाखल होणाऱ्या चिमुकल्यांसाठी बैलगाडी, उंट, घोडा, कारगाडीचीही व्यवस्था करण्यात आली होती. शाळा सजवल्या होत्या. विद्यार्थ्यांप्रमाणेच शिक्षकांतही उत्साह दिसून येत होता. सरकारी शाळांमध्ये आज पहिल्या दिवशी गणवेश व पाठ्यपुस्तकांचेही वाटप करण्यात आले. यामुळे मुलांचा उत्साह अधिक द्विगुणित झाला.

शाळेचा आज पहिला दिवस असल्यामुळे पहिल्यांसा शाळेत प्रवेश करणारी मुले आपल्या आई-बाबांसह शाळेत आली होती. शाळेची घंटा वाजली आणि मुले वर्गाकडे निघू लागली. आई-बाबांनी सोडल्यानंतर शाळेची पहिली पायरी चढणारे काही मुले रडत रडतच वर्गात जात होती तर काही मुले मोठ्या उत्साहाने आपल्या आई-बाबांना टाटा, बायबाय करीत होती. काही विद्यार्थी मात्र आपल्या पालकांना शाळा नको, घराकडे चला, असा आग्रह धरत होती. पण त्यांचे पालक समजूत काढीत होते. काही पालक हळवे झाले होते. ते थेट मुलाच्या वर्गापर्यंत गेल्याचे चित्र पाहावयास मिळाले. हे चित्र एकीकडे असताना काही मुले मात्र मोठ्या उत्साहाने वर्गात बसली होती. ती आपल्या पालकांना स्वतःहून जाण्यास सांगत होती. काही मुले रडण्याचे थांबत नव्हती. तेव्हा मात्र शिक्षकच त्या मुलांचे पालक बनून, त्यांना कडेवर घेऊन शांत करीत होते. काहींना खेळणी, बिस्किटे देत त्यांना आपलेसे करण्याचा प्रयत्न करताना शिक्षक दिसून आले.

सिध्देश्वर प्रशालेत मुलांचे औक्षण करून आणि पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. संगमेश्वर पब्लिक स्कूलमध्ये मैदानी खेळ खेळत अनोख्या पध्दतीने लहान मुलांनी शाळेत प्रवेश केला. पांढरे वस्ती येथील महापालिका शाळा क्रमांक पाच येथे मुलींना पालखीत बसवून शिक्षकांनी शाळेत आणले. यावेळी पुष्पगुच्छ देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. संभाजीराव शिंदे शाळेत मुलांना पहिल्याच दिवशी पुस्तके देण्यात आली. दमाणी शाळा आणि महेश इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये पुष्पवृष्टी करण्यात आली. हरिभाई देवकरण प्रशालेत बॅण्डच्या निनादात मुलांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. विजापूर रस्त्यावरील श्रीमती निर्मलाताई ठोकळ प्रशालेत विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळेच्या अंगणात फुले, रांगोळीच्या पायघड्या घातल्या होत्या. विद्यार्थ्यांचे मिठाईने तोंड गोड करून त्यांचे स्वागत करण्यात आले. संभाजीराव शिंदे विद्यामंदिरात शाळेचा पहिला दिवस मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांचे मोठ्या आनंदात स्वागत करण्यात आले यावेळी टांगा सफर देखिल शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली होती. चॉलकेट मिठाई वाटप मुलांना शाळेत प्रवेश देण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे डॉ. राधिका चिलका , सुरेखा हाके, मुख्याध्यापक वासुदेव इप्पलपल्ली उपस्थित होते.

मुंडेवाडी ग्रामस्थांनी ठोकले जिल्हा परिषद शाळेला कुलूप

वर्षभर एकाच शिक्षकावर चालत होती शाळा

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील मुंडेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेला गेल्या वर्षभर पाच शिक्षकी शाळा फक्त एका शिक्षकावर चालत होती.यासाठी शाळा व्यवस्थापन समिती तसेच सरपंच व प्रतिष्ठित ग्रामस्थांनी वारंवार तक्रार करुन ही शाळेला शिक्षक मिळत नसल्याने आज शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी ग्रामस्थांनी जिल्हा परिषद शाळेस टाळे ठोकून प्रशासनाचा जोरदार निषेध व्यक्त करण्यात आला.

कारण गेल्या वर्षभरापासून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने ग्रामस्थही संतापले होते.अखेर आज शैक्षणिक वर्षाच्या प्रवेश उत्सवाच्या दिवशीच ग्रामस्थांनी शाळा बंद ठेवून संताप व्यक्त केला आहे.या शाळेतील शिक्षक हे जुलै २०२२ मध्ये पदोन्नतीने अन्य शाळेवर समायोजन झाले होते. त्यामुळे शिक्षकांची संख्या कमी झाल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर परिणाम होत होता. पटसंख्या १०४ नुसार पाच शिक्षक मंजूर असताना फक्त एकाच शिक्षकावर शाळा सुरु होती.म्हणून मुंडेवाडी ग्रामस्थांनी आज शैक्षणिक वर्ष सुरु होण्याच्या पहिल्याच दिवशी शाळा बंद ठेऊन शिक्षण विभागाला दणका दिला आहे.

येत्या १५ जून पर्यंत शिक्षक उपलब्ध करून देण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत होती. आज त्यांच्या मागणीची पूर्तता न झाल्याने अखेर आज ग्रामस्थांनी शाळेस कुलूप ठोकून निषेध व्यक्त केला आहे.

शिवसेना महिला आघाडी शहरउपप्रमुखपदी अश्विनी पाटील

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट शहर शिवसेना महिला आघाडी उपप्रमुखपदी अश्विनी पाटील यांची निवड करण्यात आली. विधानसभा संघटक प्रा.सुर्यकांत कडबगावकर, कामगार सेना तालुकाप्रमुख स्वामीनाथ हेगडे, तालुकाप्रमुख महिला आघाडी वर्षाताई चव्हाण यांच्या उपस्थितीत शहरप्रमुख वैशाली हावनूर यानी निवडीचे पत्र देऊन सत्कार केले. यावेळी महिला आघाडी तालुकाउपप्रमुख अनीता घोडके, शहरउपप्रमुख वर्षाताई म्हैत्रे, विभागप्रमुख लता गायकवाड व इतर शिवसैनिक उपस्थित होते.

दुचाकी घसरल्याने वैरागमध्ये तरुणाचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

वेगाने जाणारी दुचाकी घसरल्याने गंभीर जखमी झालेला तरुण सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना बुधवारी सायंकाळी मयत झाला .

अमित बाबुराव लोंढे (वय ३० रा.मुंगशी ता.बार्शी) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे . तो काल सकाळी ११ वाजेच्या सुमारास दुचाकीवरून वैराग ते मुंगशी असा प्रवास करीत होता. वैराग येथील बालाजी फर्निजवळ दुचाकी स्लिप झाल्याने तो गंभीर जखमी झाला होता. त्याला सोलापुरातील शासकीय रुग्णालयात प्राथमिक उपचार करून खाजगी रुग्णालयात दाखल केले असता तो सायंकाळच्या सुमारास मयत झाला . या अपघाताची प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

अपघातामधील जखमीचा मृत्यू

जुना पुणे नाका परिसरातील मनोरमा हॉस्पिटल जवळ रस्ता क्रॉस करताना अनोळखी वाहनाच्या धडकेने जखमी झालेले दशरथ बसवर्गोडा कोळी (वय ६०रा.संतोष नगर बाळे) हे सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना बुधवारी सायंकाळी मयत झाले. ते ६ जून रोजी रात्रीच्या सुमारास रस्ता क्रॉस करीत होते . त्यावेळी अपघात झाला होता . याची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे .

बादलीने आणि दगडाने मारहाण महिला जखमी

लहान मुलांच्या भांडणावरून बादली, दगड आणि लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत रेश्मा मंजुनाथ अंबलजीरी (वय ३० रा. बुधवारपेठ) ही महिला जखमी झाली. ही घटना बुधवारी सायंकाळच्या सुमारास घडली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात सूर्यकांत (सासरे) यांनी दाखल केले. त्यांना सुनीता पिसाळ, शुभम पिसाळ, नागनाथ पिसाळ आणि मानसी पिसाळ या चौघांनी मारहाण केली. अशी नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे .

नीलम नगर येथे दगड विटाने मारहाण

नीलम नगर परिसरात दोन गटात चालू असलेले भांडण सोडविण्यासाठी गेले असतात दगड विटांनी केलेल्या मारहाणीत सुनील दत्तात्रय गायकवाड (वय ३४ रा. विनायक नगर,विडीघरकुल) हे जखमी झाले. ही घटना बुधवारी रात्री अकरा वाजेच्या सुमारास घडली.

त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. रोहन शिंदे आणि अन्य ६ ते ७ जणांनी त्यांना मारहाण केली .अशी नोंद एमआयडीसी पोलिसात झाली आहे.

सोलापूर स्पोर्टस् इन्स्टिट्यूटचे उन्हाळी प्रशिक्षण शिबिर

सुराज्य/सोलापूर

सालाबादाप्रमाणे यंदाही सोलापूर स्पोर्टस् इन्स्टिट्यूटच्यावतीने सलग २१ व्या वर्षी लेदर क्रिकेट बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कै. पांडुरंग पुंजाळ मैदानावर शिबिर घेण्यात आले. सदर या शिबिरातील खेळाडूंना सामने खेळायला मिळावे हे उद्देश समोर ठेवून अंतर्गत पुंजाल प्रीमीअर लिग क्रिकेट स्पर्धा भरविल्या. चार संघामध्ये लिग सामने झाले.

मुंबई, बेंगलोर, चेन्नई, गुजरात अशी संघाची नावे होती. या सामन्यामध्ये बेंगलोर संघाने अंतिम सामना जिंकला. या शिबिराच्या निरोप समारंभ व बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर शहराचे कर्तव्यदक्ष पोलीस उपायुक्त दिपाली काळे उपस्थित होते. तसेच मिलिंद नळेगाव, उद्योजक यांनी अध्यक्षपद भूषविले व गजानन कलशेट्टी उद्योजक, माजी नगरसेवक मेघनाथ येमूल, उमेश मामड्याल हे उपस्थित होते.

महापालिकेच्या ५८ शाळांमध्ये दिमाखदार प्रवेशोत्सव

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिकेच्या विविध माध्यमाच्या ५८ शाळांमध्ये वेगवेगळ्या पध्दतीने विद्यार्थ्यांचे दिमाखात स्वागत करण्यात आले. दिमाखदार असा शाळा प्रवेशोत्सव साजरा झाला. विशेष म्हणजे पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना शिक्षकांनी पालखीतून शाळेत आणले. हा स्वागत सोहळा पाहून पालकांच्या डोळ्यात आनंदाश्रू दाटल्याचे दिसून आले.

सुंदरम नगर येथील महापालिका शाळेत महापालिका उपायुक्त विद्या पोळ यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थ्यांचे फेटे बांधून स्वागत करण्यात आले. यावेळी महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रभारी प्रशासन अधिकारी विठ्ठल ढेपे यांची उपस्थिती होती. महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रभारी प्रशासन अधिकारी विठ्ठल ढेपे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध शाळांमध्ये प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. दरम्यान, पर्यवेक्षक मनीष बांगर, भगवान मुंडे, सुरेश कासार, निलोफर सय्यद, संतोष बुलबुले, रजनी राऊळ आदी पर्यवेक्षकांनी विविध शाळांना भेटी दिल्या.

विद्यार्थी पालखीतून पहिल्या दिवशी शाळेत

पांढरे वस्ती मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना आणले पालखीतून

वडील बांधकाम मजूर, आई लक्ष्मी मंडईत भाजी विक्री ,हातावर चालणारे संसार.... पण आज स्वतःच्या मुलांना शाळेच्या पहिल्या दिवशी त्यांनी पालखीतून पाहिले. शाळेचा पहिला दिवस पालक, शिक्षक, मुले यांच्या स्मरणात राहावा यासाठी मनपा मराठी मुली क्रमांक ५ पांढरेवस्ती शाळेत मुलांना पालखीत बसून घरापासून शाळेत आणण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अमोल भोसले , वर्गशिक्षक किरण शेळगे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष वर्षा सकट, पूजा हेगडे, अनिता सकट, रेणुका हेगडे, स्वाती वाघमारे, दिपाली वाघमारे, अश्विनी हेगडे यांनी पालखी खांद्यावर घेऊन मुलांना शाळेपर्यंत पहिल्या दिवशी स्वागत केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीदेवी गौडगावी, अफरीन शेख यांनी परिश्रम घेतले.

डागा शाळेत पुष्पवृष्टी व औक्षण

मनपा मराठी मुलांची सुंदराबाई डागा शाळेत पुष्पवृष्टी करुन, औक्षण करुन, गुलाबपुष्प व फुगे देत विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची शोभा वाढविण्यासाठी रंगबेरंगी फुलांची कमान करुन सुंदर व आकर्षक आरास करण्यात आली होती. या कार्यक्रमास मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे पर्यवेक्षक सुरेश कासार, संभाजीराव शिंदे डि.एड. कॉलेजचे कला शिक्षक कांबळे, नवले आदी उपस्थित होते. प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक नागेश गोसावी यांनी केले तर सूत्रसंचालन धीरज कुचेकर यांनी केले, कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी राजीव क्षिरसागर, गिरीश कुरुडे, मनोज पाटील, कावेरी पवार, अनुपमा जावळे, श्रीशैल भागानवरु यांचे सहकार्य लाभले.

अकलूज नगरपरिषद कार्यालय
जा. क्रं. ६९/अनप/बांधकाम/२०२३
दिनांक : १५/०६/२०२३

अकलूज नगरपरिषद, अकलूज

निविदा सूचना सन २०२३-२०२४

अकलूज नगरपरिषदे मार्फत अकलूज नगरपरिषद अंतर्गत खालील कामांकरीता तरी योग्य त्या कंत्राटदाराने आपले मोहरबंद निविदा दि. १६/०६/२०२३ ते २२/०६/२०२३ दु. २.०० वाजेपर्यंत मुख्याधिकारी, अकलूज नगरपरिषद याचे कार्यालयाकडे सादर करावे. सदर कामाची कोरी निविदा दि. १६.०६२०२३ ते २२/०६/२०२३ पर्यंत अकलूज नगरपरिषद कार्यालयात निविदा फॉर्म मिळेल.

अ. नं.	विभागाचे नाव	कामाचा तपशिल	अंदाजपत्रकीय रक्कम	बयाणा रक्कम	कामाचे वर्णन	निविदा फॉर्म किंमत	कामाचा कालावधी
१	२	३	४	५	६	७	८
१	बांधकाम	अकलूज नगरपरिषद हद्दी अंतर्गत रस्ते दुरुस्ती करणे.	५,००,०००/-	५०००/-	निविदा फॉर्म प्रमाणे	५००/-	३० दिवस
२	बांधकाम	अकलूज नगरपरिषद हद्दीतील सादुभाऊ चौक ते जुने बस स्थानक पर्यंत रस्ता दुरुस्ती करणे.	५,००,०००/-	५०००/-	निविदा फॉर्म प्रमाणे	५००/-	३० दिवस

वरीलप्रमाणे कामा करीता इच्छुक कंत्राटदाराने आपली सिलबंद निविदा अकलूज नगरपरिषद कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. १६/०६/२०२३ ते २२/०६/२०२३ या कालावधी पर्यंत सादर करावी. तसेच मुदती नंतर आलेल्या व निविदा बयाणा रक्कम न भरलेल्या धारकांचा विचार केला जाणार नाही. कोणतीही निविदा अथवा आलेल्या सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवला आहे.

सही/-
मुख्याधिकारी
अकलूज नगरपरिषद, अकलूज

देखणेंनी ताल वाद्यसम्राट अण्णा जोशींना माहिती पटातून उजेडात आणले

सोलापूर : मूळचे सोलापूरचे असलेल्या, बोटांच्या अद्भुत कौशल्यातून विविध प्रकारच्या २२ तालवाद्यात नैपुण्य प्राप्त केलेल्या अनेक मराठी, हिंदी चित्रपटात संगीत दिग्दर्शकांना सहाय्य केलेल्या भालचंद्र गोविंद तथा अण्णा जोशी यांच्यावर माहितीपट काढून विस्मरणात गेलेल्या व तालवाद्य सम्राट या बिरुदास पात्र असणाऱ्या हरहुन्नरी कलावंतास ज्येष्ठ रंगकर्मी दिग्दर्शक शिरिष देखणे यांनी त्यांच्या कार्यकर्तृत्वास व प्रेरणादायी जीवन प्रवासाला उजाळा दिला त्यामुळे तो ऐतिहासिक ठेवा झालेला आहे असे गौरवोउद्गार हिराचंद नेमचंद वाचनालयाचे प्रमुखकार्यवाह डॉ श्रीकांत येळेगावकर यांनी काढले. श्री हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या वतीने देखणे यांनी परिश्रमपूर्वक तयार केलेल्या ७० मिनिटांचा माहितीपट प्रदर्शित करण्यात आला याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी ज्येष्ठ साहित्यिक दत्ता गायकवाड हे होते. यावेळी मंचावर मोहन सोहनी, दीपक देशपांडे उपस्थित होते शिरीष देखणे यांनी अशोक पत्की, उत्तरा केळकर, अण्णा जोशी यांचे कुटुंबीय त्यांना ओळखणाऱ्या काही व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या.` यावेळी दत्ता गायकवाड यांनी अण्णा जोशींच्या आठवणींना उजाळा दिला रसिक प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ड्रीम फौंडेशन व पायोनियर क्लासेसच्या वतीने रविवारी गुणवंतांचा सत्कार

सोलापूर : ड्रीम फौंडेशन व पायोनियर क्लासेसच्या वतीने रविवार १८ जून रोजी 'फादर्स डे' निमित्त पूर्व विभाग सार्वजनिक वाचनालय सभागृहात कन्ना चौक येथे सकाळी ११ ते २ या वेळेत इयत्ता दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार व विविध करिअरच्या संधी यावर पुण्यातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन व प्रेरणादायी व्याख्यान आयोजित करण्यात आले असल्याची माहिती ड्रीम फाउंडेशनचे काशिनाथ भतगुणकी व आकाश पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

दहावी व बारावी बोर्ड परीक्षेत ७५ टक्केहुन अधिक टक्क्याने उत्तीर्ण झालेल्या पूर्व विभागातील विद्यार्थ्यांना सन्मानपत्र व करिअर माहितीपत्रिका देऊन आमदार विजयकुमार देशमुख, पद्मशाली शिक्षण संस्थेचे सचिव दशरथ गोप यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे. कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ समाजसेवक सुधीर खरटमल, पूर्व विभाग वाचनालयाचे अध्यक्ष पांडुरंग दिड्डी, उद्योजक गणेश पेनगोंडा, सारथी फाउंडेशनचे श्रीनिवास बुरा, भू. म. पुल्ली कन्या प्रशाला मुख्याध्यापक प्रा. संगीता सादूल, मार्कंडेय कम्प्युटरचे गणेश इराबत्ती, पॅशन कॉम्प्युटर्सचे किरण साळुंखे, सरस्वती अकॅडमीचे मल्लिकार्जुन परळकर, जीनियस कम्प्युटर्स आणि वेदांत कॅम्पुटर यांचे संचालक यांच्यासह शैक्षणिक क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे भतगुणकी यांनी सांगितले. गुणवंत विद्यार्थ्यांनी सत्कार सोहळ्यासाठी नाव नोंदणी करण्यासाठी मंजुषा पाटील यांच्याशी ९०४९३२५१११ या नंबरवर नाव नोंदणी करावी, असे आवाहन संयोजक पायोनियर क्लासेसचे संचालक दत्ता पाटील यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस आकाश बत्तुल-पाटील, मयूर गवते, मंजुषा पाटील आदी उपस्थित होते.

ए.जी. पाटील अभियांत्रिकीमध्ये टेक्नोलर्न उत्साहात

सोलापूर : अभियांत्रिकी क्षेत्रातील नवनवीन तंत्रज्ञानाची गरज ओळखून ए.जी. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात तीन दिवसीय टेक्नोलर्न कार्यशाळेचे आयोजन केले होते. यामध्ये बेसिक सर्किट पासून ऍडव्हान्स टेक्नॉलॉजी पर्यंतचे प्रात्यक्षिक शिक्षण विभागातील तज्ज्ञ प्राध्यापकांमार्फत देण्यात आले.

ही कार्यशाळा इलेक्ट्रॉनिक्स अँड टेल कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित केली गेली. विविध तंत्रज्ञानाचे प्रात्यक्षिक त्या संबंधित विविध प्रकल्प उत्स्फूर्तपणे करण्यात आली. या कार्यशाळेत ७४ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यशाळेचे नियोजन प्रा. व्ही. आर. मायलावरपू यांनी केले. आधुनिक तंत्रज्ञानासंबंधी माहिती प्रा.एस. एस. मेडगार आणि प्रा.पी.सी. ढवळे यांनी दिली ही कार्यशाळा उत्स्फूर्तपणे पार पाडण्यासाठी सर्व प्राध्यापकानी सहकार्य केले.कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्रा. एस. जे लिगाडे, प्रा. एस. एस साखरे आणि विभाग प्रमुख प्रा. डॉ.आर.व्ही.दरेकर यांनी मार्गदर्शन केले. या प्रकारच्या कार्यशाळेची आयोजन तसेच पूर्णत्वात आणण्याची प्रेरणा प्राचार्य व्ही. व्ही. पोतदार,कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांच्याकडून सहयोग मिळाला. संस्थेचे अध्यक्ष मा.ए. जी. पाटील व संस्थेचे सचिव मा.एस. ए. पाटील यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

रिपाइं अल्पसंख्याक महिला शहर अध्यक्षपदी अमिना शेख व सरचिटणीसपदी नुसरत शेख

सोलापूर : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया व रिपब्लिकन अल्पसंख्यांक विभाग सोलापूरची बैठक जिल्हा कार्यालय सोलापूर या ठिकाणी घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षपदी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया प्रदेश अध्यक्ष सुबोध वाघमोडे हे होते. या झालेल्या बैठकीमध्ये रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया अल्पसंख्यांक महिला शहर अध्यक्ष पदी आमीना शेख तर शहर सरचिटणीस पदी नुसरत शेख यांची निवड करण्यात आली. निवडीचे पत्र अल्पसंख्यांक जिल्हा महिला अध्यक्ष नसरीन शेख, अरुणा सरवदे, जिल्हा महिला अध्यक्ष पूनम मोरे, शहर अध्यक्ष यांच्या हस्ते देण्यात आले. या वेळी रिपलीकन पार्टी ऑफ इंडिया पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष जाक्कापा कांबळे, माणिक आठवले, मारुती सोनवणे, सलीम मुल्ला, श्रीमंत गायकवाड, धर्मा माने, सिकंदर शेख, इब्राहिम शेख, रफिक शेख, समीर मुजावर, दत्ता कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

पंढरपुरातल्या दगडी मूर्तीला सातासमुद्रापार मागणी

सुराज्य/सोलापूर

चंद्रभागा तीरी, उभा विटेवरी... कर कटेवरी उभा विटेवरी' असलेल्या पांडुरंगाच्या दर्शनासाठी देशासह परदेशातूनही भाविक येतात.'मानला तर देव नाही तर दगड' या उक्ती प्रमाणे देव आणि दगड यांच्यातील दोन टोकांचे अंतर मिटवण्याचे सामर्थ्य शिल्पकलेमध्ये आहे. म्हणूनच अष्ट कलातील एक कला म्हणून शिल्पकलेची ओळख आहे. अतिशय प्राचीन काळापासून विठुरायाच्या या नगरीत ही कला जोपासली जातेय आणि म्हणूनच वर्षभर येथे बनविलेल्या शेकडो आकर्षक दगडी मुर्त्या देशभर आणि अगदी सातासमुद्रापार जात असतात.

आषाढी महासोहळ्यासाठी मागणीनुसार दगडी मुर्त्या बनविण्यासाठी कारागीर सध्या रात्रंदिवस झटत आहेत. यात्राकाळात या व्यवसायातून लाखो रुपयांची उलाढाल होत असल्याने यंदा आषाढीसाठी मोठ्या प्रमाणात या मुर्त्या बनवून ठेवण्यात आल्या आहेत. विठुराया आणि विविध संतांच्या मुर्त्या हे पंढरपूरचे खास वैशिष्ट्य असते म्हणूनच वाड्या वस्त्यापासून मोठमोठ्या शहरातील मंदिरात पंढरपुरात बनलेल्या दगडी मुर्त्या विराजमान झालेल्या दिसतात .

आध्यात्मिकाची काशी मानली जाणाऱ्या पांडुरंगाच्या पंढरी नगरीत आषाढी यात्रेस विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी संपूर्ण देशाच्या कानाकोपयातून लाखो भाविक येतात. १२ महिने २४ तास हे शहर भाविकांनी गजबजलेले असते. साहजिकच येथील बाजारपेठही नावीन्यपूर्ण आहे. हाताने घडवलेल्या दगडी मूर्तीला भाविकांतून मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

आमचा हा पारंपरिक व्यवसाय असून या कारखान्यातून सर्व देवदेवतांच्या, संत, महाराज मंडळींच्या मूर्ती व महामानवाचे पुतळे दगडापासून हाताने घडवून तयार केले जातात. आमच्याकडील मूर्ती पाकिस्तानात गोरक्षनाथाची, अटलांटिकमध्ये ,गजानन महाराजांची ,जर्मनीत श्री कृष्णाची अमेरिकेत ,तुळजाभवानीची चेन्नईमध्ये तर सर्वाधिक पसंती ही विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीला आहे. दगडाला वेगवेगळा आकार देऊन पॉलिश रंग देऊन आकर्षक मूर्ती तयार केली जाते.शासनाने दहा फुटाच्या खाली जमिनीचे उत्खनन करू नये, असा नियम काढल्याने मूर्ती तयार करण्यासाठी लागणाऱ्या दगडाचा तुटवडा निर्माण झाला आहे. पुढील काळात मूर्तीचे दगड न मिळाल्यास हा व्यवसाय अडचणीत येण्याची शक्यता आहे.

– राजेंद्रसिंह मंडवाले, मूर्तीकार, पंढरपूर.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेची रोजच्या रोज पूजा,आरती करण्यासाठी देशातीलच नव्हे तर परदेशातील भाविकसुद्धा पंढरपुरात आल्यानंतर मूर्ती घेऊन जातात.गावोगावी मूर्तीची प्रतिष्ठापना करून नित्यनियमाने पूजा करतात. पंढरपुरात दगडापासून मूर्ती घडविण्याचे दहा कारखाने आहेत. या मूर्तीच्या व्यवसायावर २५० ते ३०० कुटुंबांचा उदरनिर्वाह चालतो. आषाढी यात्रेत दहा लाख रुपयांच्या आसपास मूर्तींची विक्री होते. काळापाषाण, शाळीग्राम पाषाण, मटकना मार्बल, काळा मार्बल व खाणीतील दगडापासून ही मूर्ती तयार केली जाते.हे दगड कर्नाटक, राजस्थान व ग्रामीण भागातून मागवले जातात.

सावकारकीमध्ये तारण ठेवलेली जमीन परत मागितल्याने मारहाण

आरोपी विरूध्द अपंग कायद्यानुसार गुन्हा दाखल

सुराज्य/परंडा

सावकारकी मध्ये तारण ठेवलेली जमीन परत खरेदी करून मागीतल्याने परंडा तालूक्यातील साकत येथिल अपंग शेतकरी श्रीकांत गोडगे यांना अपंग असल्याचे हिनवत मारहाण केल्या प्रकरणी भास्कर जाधव यांच्यावर परंडा पोलिसात दि १५ जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील आरोपी सावकारगी करीत असल्याचा आरोप करून त्याच्यावर सावकारगीचा गुन्हा दाखल करावा अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्या कडे शेतकरी श्रीकांत गोडगे यांनी केलेली आहे.

या बाबत पोलिस सुत्रा कडून मिळालेली माहिती अशी की यातील फिर्यादी श्रीकांत गोडगे यांनी कोर्टच्या कामासाठी पैश्याची गरज असल्याने भास्कर जाधव यांच्या कडून ७ लाख रूपये घेतले होते त्यापोटी ७५ आर जमीन तारण ठेवली होती. पैसे परत केल्यावर जमीनीची पलटून खरेदी देण्याचे ठरले होते.

शेतकरी गोडगे यांची परिस्थिती बेताची असल्याने जमीन परत मागण्यास उशीर झाला मात्र पैश्याची जुळवा जूळव करून जमीन परत करण्याची मागणी केली मात्र भास्कर जाधव जमीन परत देण्यास टाळाटाळ करत होता.

यातील साक्षीदार यांच्या मार्फत जमीन परत करन्या साठी समजून सांगीतले परंतू भास्कर जाधव याने जमीन परत करन्यास नकार दिला.

दि १३ जून रोजी सकाळी शेतात असताना भास्कर जाधव तेथे आला असता त्यात १५ लाख रुपये देतो जमीन परत दे असे गोडगे यांनी सांगीतले असता पांगळ्या लई नाटक करू नकोस दुसरा हात तोडून टाकीन असे म्हणत मारहान करून जिवे मारण्याची धमकी दिली.

अशी फिर्याद श्रीकांत गोडगे यांनी दिल्याने आरोपी भास्कर जाधव यांच्यावर अपंग कायदा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



अन्नछत्र मंडळाकडून देण्यात येणारी महाप्रसाद सेवा ही अप्रतिम : कांबळे

सुराज्य/अक्कलकोट

अन्नछत्र मंडळाकडून देण्यात येणारी महाप्रसाद सेवा ही अप्रतिम असून, येणारे भाविक हे मनापासून तृप्त होत असल्याचे मनोगत महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग महामंडळाचे लेखा अधिकारी सौ. सुवर्णलता कांबळे (मुंबई) यांनी व्यक्त केल्या.

त्या तीर्थक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सहकुटुंब आल्या असता न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा कृपावस्त्र व श्रीफळ देऊन मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी विजयकुमार खडके, समर्थ मसुती व एस.के.स्वामी, सिध्दाराम कल्याणी, बाळासाहेब पोळ, बाळासाहेब घाटगे, कल्याण देशमुख, शहाजीबापू यादव, सतीश महिंद्रकर, नामा भोसले, दत्ता माने, राजू पवार, प्रसाद हुल्ले, प्रवीण घाटगे, अतिष पवार, गोटू माने, वैभव मोरे, योगेश पवार, विशाल कलबुर्गी, फहिम पिरजादे, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, विशाल घाटगे, शरद भोसले, राहुल इंडे यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

शाळेच्या पहिल्या दिवशी मुलांचे उत्साहात स्वागत

मनपा कॅम्प शाळेत मुलांचे उत्सवात स्वागत

सुराज्य/सोलापूर

शाळेच्या पहिल्या दिवशी शहर आणि जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

शासनातर्फे मिळालेल्या शैक्षणिक साहित्याचा वापर मुलांनी योग्य पद्धतीने करून शाळेत दररोज येऊन ज्ञान संपादन करावे, असे प्रतिपादन महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळाचे माजी प्रशासन अधिकारी हनुमंत जाधवर यांनी केले.

मनपा मुलांची मराठी केंद्र शाळा कॅम्प तर्फे आयोजित नवोदतांचे स्वागत, पुस्तक आणि गणवेश वाटप कार्यक्रमाच्या वेळी अध्यक्षीय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाचे माजी कार्यगट सदस्य आणि माजी मुख्याध्यापक पद्माकर कुलकर्णी यांनी मुलांना आरोग्य विषयक काळजी घेण्यासाठी व शिक्षणाबरोबरच खेळामध्ये देखील सहभाग घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका रेहाना नदाफ यांनी केले. कार्यक्रमास पर्यवेक्षक भगवान मुंडे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आप्पासाहेब ककमारे यांनी केले, तर आभार कला शिक्षक फैय्याज शेख यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी धोंडू केंगले, राहुल नवले, रंजना गायकवाड, अश्विनी जवळगे, संध्या जाधवर, विद्या राऊत, रामेश्वरी बेरंगी यांनी परिश्रम घेतले.

चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळा

सोलापूर : फिरदोस महिला शिक्षण व समाज सेवा संस्था संचलित चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळा सोलापूर या शाळेत शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. या वेळी नवीन विद्यार्थ्यांचे डॉ. विजय शर्मा प्रा. दयानंद कॉलेज ऑल आटर्स अँन्ड सायन्स सोलापूर यांच्या हस्ते पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. प्रमुख पाहुणे,बशीर अहमद बागवान व डॉ. परवेज आलम अतनुरकर उपस्थित होते. शाळेच्या मुख्याध्यापिका सौदागर गजाला यांनी शाळा व संस्थेची माहिती दिली. सुत्रसंचालन बागबान नेहा यांनी तर खतिब उम्मे हबीबा यांनी आभार मानले.

बालभारती विद्यालय

सुप्रभात शिक्षण मंडळ संचलित बालभारती प्राथमिक माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मध्ये नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात मोठ्या आनंदात साजरा करण्यात आली. याप्रसंगी नवीन विद्यार्थ्यांचे गतवर्षी इयत्ता दहावी बोर्ड परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्याकडून त्यांचे औक्षण करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित मान्यवर- प्रमुख पाहुणे माजी महापौर श्रीकांचना यन्नम, कार्यक्रमाचे अध्यक्ष हाजी शब्बीर शेख, अख्तरबानो शेख, इम्रान शेख, रिजवान शेख, इम्तियाज मुल्ला यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी नागेंद्र नगर ,स्वागत नगर ,विष्णू नगर, ताई चौक परिसरातील सर्व नागरिक, पालक

एन् के किड्स स्कूल

एन् के किड्स स्कूल चा शाळेचा पहिला दिवस मोठ्या उत्साहात पार पडला .या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्था सदस्या अंजली गुरव शालेय समितीचे अध्यक्ष विकास करतुरे प्रिन्सिपल श्वेता करतुरे शिक्षिका दिपाली कुलकर्णी ,अश्विनी शिगन ,कोमल अद्दिलन्गे सेविका संगीता हेगडे उपस्थित होतें . या कार्यक्रमाला सर्व शिक्षक वृंद विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोशल प्राथमिक शाळा

मुस्लिम पाठ्या पेठ येथील सोलापूर सोशल प्राथमिक शाळेत आज शाळेच्या पहिल्या दिवशी भव्य स्वागत करण्यात आले. मुख्याध्यापक आसिफ इक्बाल व शिक्षकाच्या हस्ते मुलांना फूल, चॉकलेट व इतर गोड पदार्थ तसेच डोरेमॉन व बंडबाजाच्या गजरात त्यांचे भव्य स्वागत केले. यावेळी पालकांनी असे स्वागत पाहून शाळेचे कौतुक केले व मुख्याध्यापक आसिफ इक्बाल यांनी या वर्षीच्या शैक्षणिक वर्षाची सविस्तर माहिती दिली. हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे शिक्षक रेहाना शेख, कुदसिया मनियार, रिजवाना प्यारे, अर्शीया शेख, महजबीन शेख, उम्मुलफर शाहाबाद, सबीहा कमिश्नर, फातिमा कोतकुंडे, शाहीन सुंडके, फिरदोस बडेयर, तसनीम कुमठे, शहेजादी मसुलदार, गुलशन खान, महेजबीन प्यारे, आफ्रीन पठाण, तरन्नुम मुजावर, आस्मा पठाण, नसरीन शाहबाद, समीना मनियार, निखत शेख, अनिसा नालबंद, तस्कीन कलबुर्गी यांनी विद्यार्थ्यांना तयार केले तर हे कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आकिद शेख, इरफान पटेल, सादीका शेख, मुईज शेख यांनी विशेष परिश्रम घेतले.

श्री हनुमान विद्यालय लवंग येथे प्रवेशोत्सव

अकलूज : श्री हनुमान विद्यालय लवंग येथे शैक्षणिक वर्षानिमित्त नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले या कार्यक्रमास स्थानिक प्रशाला समितीचे माजी सभापती विजयराव पाटील व सर्व सदस्य, पालक व विद्यार्थी उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी परफेक्ट कॉम्प्युटर चे संचालक धनाजी चव्हाण सर यांनी संपूर्ण अर्थसहाय्य करून गुलाब पुष्प उपलब्ध करून दिले. शाळेचा पहिला दिवस असल्याने सर्व विद्यार्थी आनंदी होते, तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत केले.

हंजगी आश्रम शाळेत ट्रॅक्टर मधून प्रभातफेरी

अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील हंजगी येथील आश्रम शाळेत नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव सोहळा उत्साहापूर्वक वातावरणात संपन्न झाला.आश्रम शाळांमध्ये यावर्षी पहिलीच्या वर्गात प्रवेशित होणाऱ्या मुलांचे बॅड लावून जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी छत्रपती शाहूमहाराज,क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर या थोर व्यक्तींच्या वेशभूषा परिधान केलेल्या विद्यार्थ्यांना ट्रॅक्टर मध्ये बसवून संपूर्ण गावातून प्रभातफेरी काढण्यात आली.

या प्रवेशोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण गावातून जनजागृतीसाठी प्रभातफेरी काढली. विद्यार्थ्यांचे प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते औक्षण करून त्यांना फुल, पेन्सिल, खोडरबर देऊन शाळेत प्रवेश देण्यात आला.तसेच त्यांचे अभूतपूर्व स्वागत केले. याच वेळी पाठ्यपुस्तक व गणवेश ही विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आले.

कुचन प्रशालेचा शाळा

सोलापूर : पद्मशाली शिक्षण संस्था संचलित, कुचन प्रशालेत आज शाळा शुभारंभ दिन अतिशय उत्साहात संपन्न झाला. सर्व विद्यार्थी व पालक वर्गाचे गुलाब पुष्प व गोड खाऊ देऊन तसेच उंट व घोड्यावर विद्यार्थ्यांना बसवून इतर विद्यार्थ्यांना चॉकलेट देऊन, औक्षण करुन स्वागत करण्यात आले. पद्मशाली शिक्षण संस्थेचे सहसचिवा संगीताताई इंदापूरे, प्राचार्य युवराज मेटे, उपप्राचार्य अनिल निंबाळकर, उपमुख्याध्यापक चंद्रकांत धर्मसाले, पर्यवेक्षक दत्तात्रय मेरगू, प्रणिती सामल, मल्लिकार्जुन जोकारे यांच्या हस्ते सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रातिनिधीक स्वरुपात इ.५ वी ते इ. ८ वी च्या काही विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तकाचे पाहुण्यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार निर्मला शिंदे यांनी मानले.

कल्याणशेट्टी शिक्षण संकुल

अक्कलकोट : महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेचे सुरेखा कल्याणशेट्टी माध्य.व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, शांतीनिकेतन प्राथमिक सेमी इंग्रजी विद्यालय व गिरीजामाता मराठी विद्यालयाच्या वतीने नवीन शैक्षणिक वर्षारंभ, प्रवेशोत्सव, विदयार्थी स्वागत व मोफत पाठ्यपुस्तक वितरण उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून वृषाल येळेगावकर, डॉ सीमा सिंग, मल्लीनाथ कल्याणशेट्टी ,संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, सीईओ रुपाली शहा, ज्युनियर कॉलेज प्रमुख पूनम कोकळगी, संचालक मल्लिकार्जुन मसुती, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी व पर्यवेक्षक मोतीलाल चव्हाण हे उपस्थित होते. यावेळी शालेय परिसरात विदयार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी सेमी विभागाचे मुख्याध्यापक निखिल भालेराव, प्रा खंडेराव घाटगे, सर्व शिक्षक व पालक वर्ग मोठया संख्येने उपस्थित होते..

आमदार शहाजीबापूंच्या हस्ते हातीद जवळा रस्त्याचे भूमिपूजन

सांगोला : सांगोला विधानसभा मतदारसंघातील आमदार शहाजीबापू पाटील हे विजय झाल्यापासून कामाचाआलेख चढता चालल्याचे दिसून येते मागील तीन वर्षापासून सांगोला विधानसभा मतदारसंघांमध्ये विविध विभागाच्या हजारो कोटी रुपये निधीचे कामे चालू असल्याचे दिसून येते मार्च २०२२ अर्थसंकल्पातून ५कोटी निधी मंजूर झालेल्या हातीद मानेगाव जवळा रस्ता रा मा ३८९ कि मी ०/००ते ७/६०० या रस्त्याचे आमदार शहाजीबापू पाटील यांच्या हस्ते १४जून बुधवार रोजी हतीद येथे भूमिपूजन संपन्न झाले.

सांगोला तालुक्यातील हा प्रमुख राज्यमार्ग असून हा हा रस्ता खराब झाल्या असल्याने नागरिकांच्या गैरसोयीचा झाला होता यासाठी आमदार शहाजीबापू पाटील यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण साहेब यांच्याकडे सतत पाठपुरावा करून या रस्त्याचा कामासह तालुक्यातील प्रमुख रस्त्यांना आमदार शहाजीबापू पाटील यांनी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला आहे मंजूर केलेल्या निधीतील कामे दर्जे दार होण्यासाठी आमदार शहाजी बापू पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सूचनाही दिल्या यावेळी भाऊसाहेब रुपनर, बाबुरावजी गायकवाड, डॉ पियूष साळुंखे, संभाजी आलदर विजय शिंदे सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता अशोक मुलगीर शहाजी घाडगे सरपंच भगत यांच्यासह हतिद गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्य वाटप

अकलूज : युवा सेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त युवा सेना जिल्हा प्रमुख गणेश इंगळे यांच्या वतीने संगम ग्रामपंचायत सदस्य जयश्री इंगळे यांच्या हस्ते संगम इंगळेवस्ती या शाळे मध्ये शालेय साहित्य वाटप करण्यात आले.

यावेळी अंकुश पराडे पाटील दिपक ताटे देशमुख निता इंगळे सीताबाई ताटे देशमुख पोरे सर नवले सर झेंडे मॅडम आदी उपस्थित होते.



उन्हाळी कुस्ती प्रशिक्षण शिबिराची सांगता

अकलूज : शिवरत्न शिक्षण संस्था संचलित शिवरत्न कुस्ती प्रशिक्षण केंद्र,शंकरनगर अकलूज यांच्या वतीने घेण्यात आलेले उन्हाळी कुस्ती प्रशिक्षण शिबिराची सांगता झाली. यातील प्रत्येक खेळाडूला शिवरत्न शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. शिवरत्न कुस्ती केंद्र व ताराराणी महिला कुस्ती प्रशिक्षण केंद्राद्वारे ग्रामीण भागातील मुला मुलींना आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षण देत, गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण देण्यात आले.शिवरत्न कुस्ती केंद्रामध्ये एकूण ५० खेळाडूंनी उन्हाळी कुस्ती प्रशिक्षण शिबिरामध्ये सहभाग नोंदवला होता.

प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल सहभागी खेळाडूंना शिवरत्न शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.सदर कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक तसेच शिवरत्न कुस्ती केंद्राचे सर्व व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते.

'ढ लेकाचा' चित्रपट २६ जूनला 'अल्ट्रा झकास' ओटीटीवर होणार प्रदर्शित

सोलापूर : अत्यंत वेगळ्या धाटणीचा नवा विषय घेऊन मंगलमय वातावरणात अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट निर्मित 'ढ लेकाचा' हा नवा चित्रपट २६ जूनला अल्ट्रा झकास' या नव्या मराठमोळ्या ओटीटीवर प्रदर्शित होणार आहे, अशी माहिती दिग्दर्शक जागेश्वर ढोबळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या चित्रपटाच्या प्रदर्शनाविषयी माहिती देण्याबाबत तसेच 'पोस्टर लॉन्च' कार्यक्रमानिमित आज खास सोलापूर येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. सध्या वारकरी संप्रदायासोबत अनेक कलाकार विठ्ठरायाच्या अखंड भक्तीत तल्लीन झाल्याचं चित्र असतांनाच ढ लेकाचा' हा नवा मराठी चित्रपट महाराष्ट्रातील तमाम प्रेक्षकांसाठी एक पर्वणी ठरणार असल्याचे या चित्रपटातील कलावंतांनी सांगितले.

विठ्ठलाप्रमाणेच सर्वांच्या मदतीला धावून जाणाऱ्या भाल्याचा खडतर प्रवास 'ढ लेकाचा' या चित्रपटातून मांडण्यात आला असून, या सिनेमाचं 'पोस्टर' पंढरपुरातील प्रसिध्द विठ्ठल-रखुमाईच्या साक्षीने मंदिरात प्रदर्शित केले जाणार असल्याचे सांगण्यात आले.

'ढ लेकाचा' चित्रपटाद्वारे प्रेक्षकांना एक वेगळीच पर्वणी यातून पाहायला मिळणार आहे. नुकत्याच झालेल्या 'अंबरनाथ फिल्म फेस्टिवल'ने या चित्रपटामधील बालकलाकार आयुष उलागड्डेच्या उत्तम अभिनय कामगिरीची ओळख प्रेक्षकांना पुरस्कारामार्फत करून दिली आहे. दर्जेदार आणि उत्तम कथा यासारख्य पठडीतले आशयघन चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आणत 'अल्ट्रा मीडिया अँड एंटरटेनमेंट मार्फत 'ढ लेकाचा' सारख्या दर्जेदार मराठी चित्रपटाची जादू प्रेक्षकांना २६ जून पासून आपल्यास ओटीटीवर अनुभवता येतील, असे हे दिग्दर्शक जागेश्वर ढोबळे यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेस कलाकार आयुष उलागड्डे, अतुल महाले, मुकुंद वसुले, विठ्ठल बडगंची, संतोष उदगीरी आदी उपस्थित होते.

रोपळेत नारायण पाटील गटाला झटका

आजी-माजी ग्रामपंचायत सदस्यांसह शेकडोंचा संजयमामा शिंदे गटात प्रवेश

सुराज्य/कुर्डूवाडी

माढा तालुक्यातील परंतु करमाळा विधानसभेला जोडलेल्या छत्तीस गावांपैकी महत्त्वाचे राजकीय दृष्टिकोनातून मानले जाणारे गाव म्हणजे रोपळे. या गावातील आजी-माजी ग्रामपंचायत सदस्यांसह शेकडो तरुणांनी नारायण पाटील यांना जय महाराष्ट्र करित झटका देत करमाळा विधानसभेचे आमदार संजयमामा शिंदे यांच्या गटात जाहीर प्रवेश केला.

३६ गावांमधील एकमेव बलाढ्य स्थान नारायण पाटील गाव गटाचे रोपळे गाव होते. परंतु तेही गाव हातातून जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. रोपळे गावामध्ये दास बंधूंची ताकद सर्वाधिक जास्त आहे. आणि सर्वच दासबंधुनी मामा गटात प्रवेश केल्यामुळे मामा गटाची ताकद तिथे निश्चितच वाढली आहे . त्याचबरोबर आगामी ग्रामपंचायत निवडणुकीत रोपळे गावात भाकरी फिरण्याची शक्यता दिसून येत आहे.

रोपळे गावचे मामा गटाचे नेते अजिनाथ गोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपसरपंच तानाजी दास यांच्या अथक प्रयत्नाने रोपळे येथील बहुसंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते यांचा आमदार संजयमामा शिंदे यांच्या गटात महाप्रवेश संपन्न झाला.

त्यामध्ये ज्येष्ठ नेते, सरपंच सर्जेराव दास, बाबु अप्पा दास, अशोक मेहेर, ग्रा प सदस्य, उपसरपंच तानाजी दास, बाळासो दास, सुनील दास, अनिकेत दास, ज्ञानदेव भैरू गोडगे, विकास दास साहेब, बापूराव रामचंद्र दास, विनोद मेहेर चेअरमन, शशिकांत माळी सदस्य प समिती, अमोल शेठ माने (उद्योजक), शिवाजी लोंढे, दत्तात्रय दास,दिलीप दास, यांच्यासह गावातील आजी माजी पदाधिकारी व तरुण वर्ग यांनी प्रवेश केला.

यांच्या प्रवेशामुळे रोपळेत भाकरी फिरणार?

सर्जेराव दास, बाबू अप्पा दास, अशोक मेहेर, तानाजी दास, बापूराव दास, बाळासाहेब उद्धव दास, दिलीप केमदरे, शुभम लक्ष्मण दास, सागर पोपट दास, आण्णा विठ्ठल दास , सुनील पोपट दास, अनिकेत दिलीप दास , रमेश पोपट दास, सुनील पंडित दास, अमोल रावसाहेब दास, लक्ष्मण दास, बालाजी सिद्धेश्वर दास, राम सिध्देश्वर दास, अभिषेक दादा दास, दत्तात्रय दास, गणेश दास पैलवान, दत्तात्रय पंडित दास, राजाभाऊ सर्जेराव दास, विकास नवनाथ दास , नागेश दत्तात्रय दास.

श्रीनाथ विद्यालयात गुणवंतांचा सत्कार

सुराज्य/श्रीपूर

श्रीनाथ विद्यालय व कै. विजयकुमार उर्फ बाबासाहेब शंकरराव पाटील कनिष्ठ महाविद्यालय बोरगाव येथे इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

इयत्ता १० वी मधील गुणवंत विद्यार्थी पुढीप्रमाणे- पिसे अनुजा शे.गुण ९४.४० , गमे तृप्ती शे. गुण ९३.६० , सुरवसे समृध्दी शे.गुण ९२.६० , दगडे गौरी शे. गुण ९२.४० , सुरवसे प्रियंका शे. गुण ९१.२० , माने देशमुख श्रुतिका शे.गुण ९०.६०, दगडे वैष्णवी शे. गुण ८१.८०, भुसनर पृथ्वीराज शे. गुण ८१.४०, साळुंखे प्राची शे. गुण ८० टक्के

इयत्ता १२ वी विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे - क्षीरसागर नम्रता शे. गुण ८१ , इंगोले गौरी शे. गुण ८०.३३ , पांढरे प्राची ७९.३३. इयत्ता १२ वी वाणिज्य शाखेतील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे - भोंग प्रमिला शे. गुण ८२.८० , इनामदार अनुराधा शे. गुण ७१ , गायकवाड प्रियंका शे. गुण ७०.८३ इयत्ता १२ वी कला शाखेतील गुणवंत विद्यार्थी पुढीलप्रमाणे - चोरमले निकिता शे. गुण ७५ , बाबर दिपाली शे. गुण ७१.५० , शेळके अमरजा शे. गुण ७०.५०

वरील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य व स्थानिक स्कुलकमिटी चेअरमन राजकुमार पाटील , माजी प.स. सदस्या व शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा कुमुदिनी पाटील , स्कूल कमिटी सदस्य डॉ. रमेश बिडवे, सुधीर कपडेकर , प्राचार्य कांबळे के. टी., उप मुख्याध्यापक भुजबळ एम एस , पर्यवेक्षक लष्कर आर. टी., पत्रकार महादेव जाधव आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

तसेच या वेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीनिवास गज्जम यांनी केले. सूत्रसंचालन सोनाली पाटील यांनी केले तर आभार तुषार ढवळे यांनी मानले.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या वर्धापनानिमित्त विद्यार्थ्यांचा शनिवारी सत्कार

सुराज्य/टेंभुर्णी

शनिवार दि. १७ जून रोजी सायंकाळी ६ वा.टिळक रोड टेंभुर्णी येथे राष्ट्रवादी काँग्रेस माढा तालुका यांचे वतीने १० व १२बोर्ड परीक्षा ,स्पर्धा परीक्षा तसेच विविध खेळा उज्ज्वल यश प्राप्त केलेल्या विद्यार्थी तसेच विविध पदांवर निवड झालेल्या व्यक्तींचा सन्मान शरदचंद्र पवार विद्यार्थी व नागरिक सन्मान कार्यक्रम' या उपक्रमांतर्गत केला जाणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या २४ व्या वर्धापन दिनानिमित्त सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे कार्यक्रमाचे संयोजक राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका उपाध्यक्ष सचिन होदाडे यांनी सागितले.सदर कार्यक्रमाला माढा विधानसभा मतदारसंघाचे युवक नेते तथा जिल्हा दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह शिंदे व प्रमुख उपस्थितीत व्याख्याते डॉ. लक्ष्मण आसबे हे उपस्थित राहणार असून विद्यार्थ्यांसाठी आदर्श जिवन या विषयावर व्याख्यान त्यांचे होणार आहे.

या वेळी माढा तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन तुकाराम उर्फ बंडू नाना ढवळे ,शिवाजीराव पाटील, टेंभुर्णी सरपंच प्रमोद कुटे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत कार्यक्रमास सर्व कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे माढा विधानसभा अध्यक्ष रमेश पाटील व तालुका अध्यक्ष कैलास तोडकरी यांनी केले आहे.

तन्वी राणेचे घवघवीत यश

सुराज्य/अकलूज

अकलूजयेथील पेक्स हास्पिटलचे संचालक सुप्रसिध्द हृदयरोग तज्ञ डॉ. नितिन राजीव राणे यांची कन्या कु.तन्वी राणे हिने इंडियन सेंटर फॉर सेकंडरी एज्युकेशन बोर्डाच्या इ.१० च्या परीक्षेत ९८.२० टक्के गुण मिळवुन अकलूजच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे. देशपातळीवर नाव लौकीक असलेल्या पुणे मुळशी येथील रिव्हरडे इंटरनॅशनल स्कुलमध्ये तन्वी राणे इ.१० वी मध्ये शिक्षण घेत होती.तिच्या यशामुळे अकलूजचे नाव देशपातळीवर गाजले असुन या यशाबद्दल सर्वच स्तरातून तिच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

नर्सिंग क्षेत्रातील विद्यार्थ्यांनी सेवाभाव जपावा : मोहिते- पाटील

सुराज्य/अकलूज

नर्सिंग क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांनी सेवाभाव जपला पाहिजे. ही एक प्रकारे देशसेवा आहे. रुग्णांची सेवा करणे म्हणजे देवदूताचे कार्य आहे असे प्रतिपादन शिवरत्न शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष धैर्यशील मोहिते पाटील यांनी व्यक्त केले.

शिवरत्न शिक्षण संस्था संचलित विजयसिंह मोहिते-पाटील स्कूल अँड कॉलेज ऑफ नर्सिंग अँड मेडिकल रिसर्च इन्स्टिट्यूटच्या बी.एस्सी. (नर्सिंग), जीएनएम व एएनएम विभागातील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांच्या शपथग्रहण व दीपप्रज्वलन समारंभ (लॅम्प लाइटिंग सोहळा) पार पडला याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी नॅशनल फ्लोरेंस नाईटिंगल २०१२१ राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त श्रीमती मनीषा जाधव , संस्थेच्या अध्यक्षा शितलदेवी मोहिते-पाटील या मान्यवरांची कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती होती.

परीस्थितीत कशी ही असूदेत सेवाभावी वृत्तीने आपण सर्व विद्यार्थ्यांनी नर्सिंग क्षेत्रात काम करायला हवे असे सांगत श्रीमती सौ.मनीषा जाधव यांनी नर्सिंग क्षेत्रासंबधी आपले अनुभव व विविध पैलूंवर विद्यार्थांना मार्गदर्शन केले.

याप्रसंगी बोलताना धैर्यशील मोहिते-पाटील यांनी विजयसिंह मोहिते-पाटील नर्सिंग महाविद्यालयातील बाहेर पडलेले ७८% विद्यार्थी सरकारी, खाजगी,परदेशात देखील सेवा देत आहे सांगत महाविद्यालय व विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा सांगितला.या कार्यक्रमास डॉ.संतोष खडतरे ,डॉ.नितीन राणे,डॉ. सुरेश सुर्यवंशी,डॉ.श्रीकांत देवडीकर, डॉ.धनेश गांधी,डॉ.निखिल मिसाळ संस्थेचे संचालक प्रा.डॉ.विश्वनाथ आवड, रोटरी क्लबचे नितीन दोशी, व्यवस्थापन चेअरमन पराग गायकवाड, प्राचार्य मेरी सुमती, प्रा.शिवतीर्थ हिरेमठ, अश्रफ शेख व इतर मान्यवर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्ह्यातील शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे वाजत गाजत स्वागत

सोलंकरवाडीमध्ये ट्रॅक्टरमधून विद्यार्थ्यांची मिरवणूक

सुराज्य/मोडनिंब

जिल्हा परिषद शाळा सोलंकरवाडी येथे शाळा प्रवेशोत्सव व पहिलं पाऊल उपक्रम उत्साहात संपन्न.झाला. नवागत विद्यार्थ्यांचे पहिलं पाऊल संस्मरणीय ठरावं म्हणून इयत्ता पहिलीच्या वर्गामध्ये दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाब पुष्प, नवंकोरं पुस्तक आणि पेन्सिल देऊन करण्यात आले. रंगीत पट्ट्या फुगे आणि रंगीत रिंगा यांच्या साह्याने सजवलेल्या ट्रॅक्टरमधून या विद्यार्थ्यांची गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. शाळेतील ज्येष्ठ शिक्षक बाळराजे पाटील यांनी या मिरवणुकीचे उत्कृष्ट नियोजन केले होते.

पहिलीच्या विद्यार्थ्यांबरोबरच पालकांनाही सेल्फी पॉइंटमध्ये फोटो काढून घेण्याचा मोह आवरता आला नाही.सुट्टीनंतर शाळेचा पहिला दिवस असल्याने सर्वच मुले अगदी आनंदाने शाळेच्या उपक्रमामध्ये सामील झाली होती. वर्षभर विविध उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जातील असे आश्वासन मुख्याध्यापक रामकृष्ण केदार यांनी दिले. यावेळी सोलंकरवाडीचे सरपंच बाबासाहेब पांढरे, माजी सरपंच अनंता गलांडे,ग्रामीण विकास संस्थेचे राजाभाऊ भांगिरे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष वामन यादव, ग्रामस्थ व पालक उपस्थित होते.यावेळी परमेश्वर सुरवसे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन केले अनिल रोकडे यांनी आभार मानले.

अकलूज येथे बैल गाडीतून शाळा प्रवेश

अकलूज : अकलूजमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा दत्तनगर-अकलुज यांच्या वतीने नवीन प्रवेशाबाबत जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

आधुनिक काळ असुन बैलगाडीत बसवून विद्यार्थ्यांना शाळेत पोहोचले. त्यामुळे विद्यार्थी खुप खुश दिसत होते. बैलगाडा चालक लांडगे यांचे बैलगाडीचे यावेळी सहकार्य लाभले. सामाजिक कार्यकर्ते अविनाश भैय्या सोनवणे, अक्षय जाधव, लखन बेंद्रे, तेजस उबाळे, कबीर मुलाणी, यांनी मनोरंजनात्मक घोषणा देऊन रॅलीला रंगत आणली. शिवाय जिल्हा परिषदेच्या मुख्याध्यापिका गुंड, काझी, धोत्रे, कदम, केवटे, यांनी भरपूर परिश्रम घेतले.

जनता विद्यालय टेंभुर्णी

टेंभुर्णी : शिक्षण प्रसारक मंडळ टेंभुर्णी या संस्थे संचलित जनता विद्यालया मध्ये आज पासून प्राथमिक व माध्यमिक शाळा चालू झाल्याने आज प्रथम दिनी आलेल्या विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प व नवीन पुस्तके भेट देऊन स्वागत करण्यात आले.

टेंभुर्णी शहरातील शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जनता विद्यालय हे या शहरातील जनता व विद्यार्थ्यांसाठी आपुलकीचे,श्रद्धेचे व सर्वांचे आकर्षणाची माध्यमिक शाळा आहे. याप्रसंगी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव दत्तात्रय यादव, संचालक श्री सुभाष मेथा, विलास देशमुख तसेच प्रभारी मुख्याध्यापक मोमीन सर आणि त्यांचे सर्व सहकारी शिक्षक वर्ग तसेच शिक्षकेतर कर्मचारी वर्ग हजर होता.

कर्मवीर भाऊराव पाटील विदयालय

पिलीव : माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील कर्मवीर भाऊराव पाटील विदयालयात आज शाळेच्या पहील्या दिवशी पाचवीमध्ये प्रवेश घेतलेल्या नवीन विदयार्थांनचे गुलाबपुष्प व पुस्तके देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी पर्यवेक्षीका मोरे यांनी तसेच झाडे यांनी विदयार्थ्यांचे स्वागत करुन शुभेच्छा दिल्या. तसेच विदयार्थी ना मार्गदर्शन केले .कार्यक्रमास पालक ,विदयार्थी शिक्षक मेटकरी सर,जाधव सर,जरे, कुलकर्णी, लिंगे, आठरे, घोडके, हिरके, जाधव,ढोले, लिंगे यांनी प्रास्तविक केले तर हिरके यांनी आभार मानले.

महत्त्वाचे वृत्त

मुंबई लोकलमध्ये विद्यार्थिनीवर बलात्कार

मुंबई : मुंबईत एका ४० वर्षीय व्यक्तीने लोकल ट्रेनमध्ये २० वर्षीय तरुणीवर बलात्कार केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मुंबईत धावत्या लोकल ट्रेनच्या लेडीज डब्यात आरोपीने मुलीवर बलात्कार केला. ही घटना बुधवारी सकाळी घडली. मिळालेल्या माहितीनुसार पीडित तरुणी एकटीच प्रवास करत होती, मुंबईतील गिरगाव येथील रहिवासी असलेली ही तरुणी नवी मुंबईतील बेलापूरच्या दिशेने जात होती. ती परीक्षा देण्यासाठी लोकलने प्रवास करत होती. घटनेनंतर तरुणीने रेल्वे सुरक्षा दलाकडे (आरपीएफ) जाऊन तक्रार दाखल केली होती. त्यानंतर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला.

वैद्यकीय महाविद्यालयात डीएनबी अभ्यासक्रम

मुंबई : सर्वसामान्य जनतेला उत्तम आरोग्य सेवा मिळावी, वैद्यकीय महाविद्यालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये अतिरिक्त डॉक्टर उपलब्ध व्हावेत तसेच वैद्यकीय महाविद्यालयांसाठी अतिरिक्त शिक्षकवर्ग मिळावेत या उद्देशाने राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये डीएनबी अभ्यासक्रमाच्या अतिरिक्त जागा निर्माण करण्याचा निर्णय वैद्यकीय शिक्षण विभागाने घेतला आहे.

अकोला जिल्ह्यात बच्चू कडूंना 'दे धक्का'

अकोला : ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीने बच्चू कडूंच्या प्रहारला अकोल्यात जोरदार हादरा दिला आहे. जिल्ह्यातील प्रहारच्या पदाधिकाऱ्यांनी बच्चू कडूंची साथ सोडून ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून वंचित आघाडीत प्रवेश घेतला. यामुळे प्रहार पक्षाचे संघटन मजबूत करण्याच्या मोहिमेला धक्का बसला आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रहार जनशक्ती पक्षाचे उपजिल्हाप्रमुख निखिल गावंडे यांच्यासह तालुका प्रमुख तुषार पाचकोर, संजय बुध, ग्रा. पं. लोतखेळ उपसरपंच विशाल नागरे यांनी सहकाऱ्यांसह वंचित बहुजन आघाडीत प्रवेश केला. वंचितच्या मुंबईतील प्रदेश कार्यालयात हा प्रवेश सोहळा झाला. यावेळी वंचितचे जिल्हाध्यक्ष प्रमोद देंडवेंसह पदाधिकारी उपस्थित होते. दरम्यान, जिल्हा परिषदेत वंचित बहुजन आघाडीला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी महाविकास आघाडीचा प्रयोग झाला होता. त्यावेळी प्रहार जनशक्ती पक्षाकडून स्मृती गावंडे यांना सभापतिपद देऊन वंचितांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न झाला.

लैंगिक अत्याचारप्रकरणी दोन भावांना २५ वर्षे शिक्षा

सांगली : अल्पवयीन मुलीला खाऊ देण्याच्या आमिषाने बोलावून लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी दोन वृद्ध भावांना २५ वर्षे सश्रम कारावास आणि दहा हजार रूपये दंडाची शिक्षा जिल्हा सत्रन्यायाधीश डी. एस. हातरोटे यांनी गुरूवारी सुनावली. यशवंत मारूती ऐवळे (वय ६५) आणि निवास मारूती ऐवळे (वय ५८ रा. शिवाजीनगर कडेगाव) या दोन भावांना बलात्कार, लहान मुलांचे लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार ही सजा ठोठावण्यात आली. मे २०२० मध्ये वरिष्ठ भावाने एका अल्पवयीन मुलीला खाऊचे आमिष दाखवून ऊसाच्या शेतात नेऊन लैंगिक अत्याचार केले होते, तर दुसऱ्याने शेडमध्ये नेऊन अत्याचार केले होते. हा प्रकार कोणाला सांगितलास तर तुला व तुझ्या घरच्यांना ठेवणार नाही, अशी धमकीही दिली होती.

'ऑरेंज सिटी' नागपूर, बनली 'पिंक सिटी'

नागपूर : 'ऑरेंज सिटी' अशी ओळख असलेले नागपूर गुरुवारी 'पिंक सिटी' झाल्यासारखे वाटत होते. त्याला कारण ठरले भारत राष्ट्र समितीचे अध्यक्ष आणि तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांचा नागपूरचा दौरा. महाराष्ट्रात राजकीयदृष्ट्या आपला पक्ष मजबूत करण्यासाठी के. चंद्रशेखर राव नागपुरात आले. त्यांच्या स्वागतासाठी भारत राष्ट्र समितीने नागपुरात जय्यत तयारी केली असून ठिकठिकाणी पक्षाचे झेंडे, बॅनर, पोस्टर्स लावण्यात आले आहेत. त्याच्या माध्यमातून तेलंगणा सरकारच्या विविध योजना आणि त्यांची माहिती जनतेसमोर मांडण्यात आली आहे.

अभिनेत्री शिल्पा शेट्टींच्या घरी चोरी; दोघे ताब्यात

मुंबई : बॉलिवूडची सुप्रसिद्ध अभिनेत्री शिल्पा शेट्टी हिच्या घरी चोरी झाली आहे. शिल्पा शेट्टी जुहूच्या राहत्या घरी चोरी झाली आहे. शिल्पाच्या घरी चोरी झाली आणि या प्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतलं आहे. शिल्पा शेट्टीच्या घरातील महागड्या वस्तूंची चोरी झाली होती. त्यानंतर तिने पोलिसात धाव घेतली होती. आठवड्याभरापूर्वी चोरी झाल्यानंतर पोलिसांना आता या प्रकरणात दोघांना ताब्यात घेतलं आहे. 'मिड-डे'ने या विषयीचं वृत्त दिलं आहे. पोलिसांनी शिल्पाच्या घरातून चोरी केलेल्या वस्तू जप्त केल्या असल्याचीही माहितीही समोर आली आहे. पोलिसात तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवत चोरांचा छडा आठवडाभरात लावला आहे.

सरकारी कर्मचाऱ्यांची होणार लठ्ठपणाची तपासणी

मुंबई : राज्यातील नागरिकांमधील वाढत्या स्थूलपणाची समस्या लक्षात घेऊन वैद्यकीय शिक्षण विभागाने 'स्थूलपणा : जनजागृती आणि उपचार' अभियान हाती घेतले आहे. राज्यात ४ मार्चपासून सुरू करण्यात आलेल्या या अभियानामध्ये सुरुवातीला शालेय विद्यार्थ्यांची तपासणी करण्यात आली होती. आता राज्यातील सरकारी कार्यालयातील कर्मचारी व अधिकाऱ्यांच्या स्थूलपणाची तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. येत्या १९ ते २६ जूनदरम्यान राज्यातील सरकारी कार्यालयामध्ये ही मोहीम राबविण्यात येणार आहे.

दिल्लीत इमारतीला आग; क्लासमधील मुले बचावली

सुराज्य/नवी दिल्ली

दिल्लीतील मुखर्जी नगरमध्ये एका इमारतीला आग लागल्याची घटना घडली. यातील धक्कादायक बाब म्हणजे या इमारतीत अनेक कोचिंग क्लास आहेत. इमारतीमध्ये ये-जा करण्यासाठी एकाच ठिकाणी पायऱ्या आहेत. त्यामुळे २२शीच्या मदतीने मुलांना खाली येण्यात आले. हा थरार थक्क करणारा होता. या घटनेमुळे कोचिंग क्लासच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे.

दुपारी १२ च्या सुमारास या इमारतीला आग लागली. इमारतीमध्ये एकाच ठिकाणी ये-जा करण्यासाठी पायऱ्या आहेत.

परिणामी मुलांना तत्काळ इमारती बाहेर पडता आले नाही. आगी पसरत चालल्याने मुलांमध्ये भीती पसरली. तेथे उपस्थित नागरिकांनी मुलांना २२शीच्या मदतीने खाली उतरवले. सर्व मुलांना सुखरुप तेथून बाहेर काढण्यात आले. आग विझविण्यासाठी अग्निशमनच्या ११ गाड्या दाखल झाल्या. आग नियंत्रणात आली आहे. आग लागलेल्या बहुमजली इमारतीच्या तळमजल्यावर असलेल्या ईलेक्ट्रीक बोर्डाला आग लागली होती. ही आग हळूहळू पसरत गेली.

बिपरजॉय गुजरातला धडकले

द्वारका आणि कच्छमध्ये विध्वंस २४० गावांतील वीज पुरवठा खंडीत

अहमदाबाद : महाभयंकर बिपरजॉय (Cyclone Biparjoy) चक्रीवादळाने गुजरातमधील नागरिकांच्या हृदयाची धडधड वाढवलीय. कारण ताशी तब्बल १४५ किलोमीटर वेगाने धडकलेल्या चक्रीवादळानंतर गुजरातमध्ये लँडफॉल सुरु झालंय. लँडफॉलनंतर गुजरातमधील द्वारका, कच्छ (Saurashtra Kutch region) आदी किनारपट्टीवर विध्वंस सुरू झाला आहे. रात्री उशिरापर्यंत लँडफॉल सुरू राहण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तवल्यामुळे एकून किती विध्वंस होईल, हे स्पष्ट झालेलं नाही. त्यामुळे सुरक्षित स्थळी हलवलेल्या ७४ हजार नागरिकांच्या मालमत्तेचं काय झालेलं असेल, हे सकाळीच स्पष्ट होईल. दरम्यान पुण्यातील छ्छ्छ्र चं पथक द्वारकेमध्ये मदतकार्य करत आहे.

खबरदारीचा उपाय म्हणून आठ किनारी जिल्ह्यांमधून यापूर्वीच ५४ हजार नागरिकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आलंय. चक्रीवादळाचा मोठा तडाखा कच्छच्या किनाऱ्याला तसेच देवभूमी द्वारकेला बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे कच्छ किनारपट्टीतील २४० गावांतील वीजपुरवठा खंडीत करण्यात आलाय. शिवाय दुर्घटना टाळण्यासाठी सार्वजनिक वाहतूकदेखील बंद करण्ग्रात आली आहे दरम्यान, गुजरातमध्ये NDRFच्या १८ तुकड्या तैनात असून लष्कर, नौदल आणि वायुदलाचीही मदत घेण्यात आली आहे.

गुजरात आणि पाकिस्तानच्या किनारपट्टीवर गुरुवारी संध्याकाळी धडकलं. त्यानंतर गुजरातमध्ये मुसळधार पाऊस आणि सोसाट्याचा वारा (heavy rainfall and strong winds) सुरू झाला. त्यामुळे किनारपट्टीवर अलर्ट जारी करण्यात आला आहे. वाऱ्याचा वेगही १२५ ते १४५ किमी इतका आहे. त्यामुळे अनेक झाडे कोसळली आहेत.

मुंबईत समुद्र खवळला

बिपरजॉय चक्रीवादळाचा परिणाम मुंबईतही जाणवतोय. मुंबईचा समुद्र खवळला आहे. मरीन ड्राईव, जुहू चौपाटी, वसई-विरारतील समुद्रकिनारी या वादळाचा परिणाम जाणवतोय. समुद्रात उंचच उंच लाटा उसळत आहेत. खबरदारी म्हणून मुंबईच्या सर्व चौपाट्या आणि सी फेस बंद करण्यात आलेत. चौपाटींवर येणाऱ्या लोकांना पोलिसांकडून बाहेर जाण्याचा आवाहन केलं जातय. शिवाय खबरदारीचा उपाय म्हणून चौपाट्यांवर जीवरक्षकही तैनात आहेत.

तणाव बाजूला ठेवून मदतीसाठी भारत सरसावला

सुराज्य/नवी दिल्ली

बिपरजॉय चक्रीवादळ अवघ्या काही तासांत गुजरातच्या कच्छ भागातील जखाऊ बंदरावर धडकणार आहे. या पार्श्वभूमीवर किनारपट्टी भागातील हजारो नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. मात्र, चक्रीवादळ धडकल्यानंतर त्याचा प्रभाव किती काळ आणि किती क्षेत्रावर राहील, यासंदर्भात सविस्तर आढावा घेऊन आवश्यक त्या उपाययोजना केल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर एकीकडे भारतातील परिस्थितीवर लक्ष ठेवतानाच भारतानं या नैसर्गिक संकटकाळात तणाव बाजूला सारून पाकिस्तानलाही शक्य ती मदत करण्यासाठी पुढाकार घेतल्याची माहिती भारतीय हवामान विभागाचे महासंचालक मृत्यूंजय महापात्रा यांनी दिली आहे.

बिपरजॉय चक्रीवादळाचा तडाखा गुजरातच्या किनारपट्टी भागाला बसणार असल्याच्या पार्श्वभूमीवर योग्य त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. त्यासाठी किनारी भागातील हजारो नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं आहे. तसेच बचाव यंत्रणाही सज्ज झाली असून उद्भवणाऱ्या गंभीर परिस्थितीसाठी एनडीआरएफचे पथकंही सज्ज आहेत.

दरम्यान, उद्या सकाळी अर्थात १६ जून रोजी सकाळी या चक्रीवादळाचा वेग कमी होईल, अशी माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. गुरुवारी दुपारच्या निरीक्षणानुसार जखाऊ बंदरापासून १८० किलोमीटरवर चक्रीवादळ आहे. गुरुवारी संध्याकाळी किंवा रात्री ते कराची आणि मांडवीमधील किनारी भागात धडकेल. जखाऊ बंदराजवळ त्याचा लँडफॉल असेल. त्यावेळी चक्रीवादळाचा वेग ११० ते १२५ किलोमीटर प्रतीतास असेल. हाच वेग रात्रीपर्यंत कायम राहील. त्यानंतर वेग कमी होत जाईल. शुक्रवारी सकाळपर्यंत वादळाचा वेग ताशी ६५ ते ७० किलोमीटर इतका कमी होईल, अशी माहिती हवामान विभागाचे महासंचालक मृत्यूंजय महापात्रा यांनी एका खाजगी वृत्तवाहिनीशी बोलताना दिली.

पंजाब नॅशनल बँकेला मुंबई उच्च न्यायालयाने फटकारले

सुराज्य/पंजाब

या कर्ज घोटाळा प्रकरणात इतका मोठा निधी गुंतलेला असताना पंजाब नॅशनल बँकेने (पीएनबी) तत्परतेने पावले उचलल्याचे दिसत नाही. शेवटी हा सार्वजनिक पैसा आहे. मग तत्परतेने पावले का उचलण्यात आले नाहीत?', असा प्रश्न मुंबई उच्च न्यायालयाने बुधवारी सुनावणीदरम्यान उपस्थित केला.

हिरेव्यापारी नीरव मोदीने 'पीएनबी'कडून हजारो कोटी रुपयांचे कर्ज घेऊन घोटाळा केल्यानंतर तपास यंत्रणांनी गुन्हा नोंदवून केलेल्या कायदेशीर कारवाई अंतर्गत मोदीच्या ४८ मालमत्तांवर टांच आणली. त्यापैकी ५०० कोटी रुपयांहून अधिक मूल्याच्या २१ मालमत्तांबाबत विशेष पीएमएलए न्यायालयाने ऑक्टोबर-२०२२मध्ये आदेश केला होता.

त्याद्वारे १२ मालमत्ता जप्त करण्याची परवानगी न्यायालयाने सक्तवसुली संचालनालयाला (ईडी) दिली; तर बुडित कर्जांची थकबाकी वसूल होण्यासाठी उर्वरित मालमत्ता जप्त करून पुढील कार्यवाही करण्याची परवानगी 'पीएनबी'ला मिळाली. त्यानंतर 'बँक व ईडी'नेही उच्च न्यायालयात अपिल केले आहे. धनको (क्रेडिटर) म्हणून उर्वरित १२ मालमत्तांवरही आमचाच पहिला हक्क आहे. कारण आम्ही कर्जे दिली होती. त्यांची परतफेड झाली नसल्याने आमच्या बँकिंग व्यवहारांवर विपरित परिणाम झाला आहे', असे म्हणणे बँकेने आपल्या अपिलात मांडले आहे. तर धनको म्हणून अप्रतिभूत मालमत्तांवर बँकेचा अधिकार नाही. कारण तपाससंस्था म्हणून आरोपीच्या पूर्ण मालकीच्या मालमत्तांवर आमचा पहिला हक्क आहे', असे म्हणणे 'ईडी'ने अपिलात मांडले आहे.

न्या. रेवती मोहिते डेरे व न्या. गौरी गोडसे यांच्या खंडपीठाने दोन्ही अपिलकर्त्यांना आपापले उत्तर दाखल करण्यासाठी दोन आठवड्यांचा अवधी देऊन तीन आठवड्यांनी सुनावणी ठेवली. त्याचवेळी खंडपीठाने 'पीएनबी'च्या भूमिकेबाबत प्रश्न उपस्थित केला. मात्र, आरोपीने घेतलेली कर्जे अनधिकृत होती याची कल्पना बँकेला नव्हती, असे म्हणणे बँकेच्या वकिलांनी मांडले.

रक्तदानाच्या टक्क्यात वाढ



सुराज्य/सोलापूर : राज्यात रक्तदान करणाऱ्यांची संख्या वाढत असून, गेल्या वर्षी (२०२२) विक्रमी १९.२८ लाख (युनिट) पिशव्यांचे संकलन झाले आहे. राज्यात ९९.३२ टक्के रक्त ऐच्छिक रक्तदानाद्वारे गोळा झाले आहे.

जागतिक रक्तदान दिनानिमित्त (१४ जून) राज्य रक्त संक्रमण परिषदेने रक्ताचा तुटवडा दूर करण्यासाठी सातत्याने शिबिरांचे नियोजन करण्याची गरज व्यक्त केली.

उन्हाळ्याच्या दिवसात सुट्ट्या असल्याने शिबिरांची संख्या कमी होते. उन्हाळ्यात अनेक रुग्ण शहरातील रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यासाठी येतात. पावसाळ्यात डेंगी, मलेरिया, साथरोगांच्या रुग्णांचे प्रमाण वाढते. अशा रुग्णांना रक्त आणि त्यांच्याशी संबंधित घटक द्यावे लागतात. या कारणांमुळे या दोन ऋतूंमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण होतो.

खडकवासला : तळ गाठले; पुणेकरांवर जलसंकट

सुराज्य/पुणे

पुण्याला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळी प्रकल्पात सध्या फक्त पाच अब्ज घनफूट (टीएमसी) पाणी शिल्लक राहिले आहे. जिल्ह्यातील एकूण ३१ धरणांपैकी बहुतांश धरणांमधील पाणीसाठ्याने तळ गाठल्याचे जलसंपदा विभागाच्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे येत्या काही आठवड्यांत जिल्ह्यात पाऊस न झाल्यास पाणीटंचाईच्या संकटाला सामोरे जावे लागण्याची भीती आहे.

जून महिना सुरू झाल्यानंतर नागरिकांसह शेतकरीही आता मान्सूनच्या प्रतीक्षेत आहेत. तरीही काही भागांत अवकाळी पावसानेच हजेरी लावली आहे. खडकवासला धरण साखळी प्रकल्पातील खडकवासला, पानशेत, वरसगाव आणि टेमघर या धरणांतून पिण्यासाठी; तसेच ग्रामीण भागाला शेतीसाठी पाणीपुरवठा करण्यात येतो. या चारही धरणांतील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे.



शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरण साखळीत बुधवारी (१४ जून) ५.०५ टीएमसी (१७.३१ टक्के) पाणीसाठा शिल्लक राहिला आहे. खडकवासल्यामध्ये १.०३ टीएमसी, पानशेतमध्ये १.३५ टीएमसी, वरसगाव धरणामध्ये २.५३ टीएमसी आणि टेमघरमध्ये ०.१३ टीएमसी पाणी शिल्लक असल्याचे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले. पिंपरी-चिंचवडला पाणीपुरवठा करणाऱ्या पवना धरणातील पाणीसाठाही घटून १.७६ टीएमसीवर गेला आहे.

मायावतींच्या भावाला २६१ फ्लॅट मिळाले

सुराज्य/उत्तर प्रदेश



रिअल इस्टेट फर्म लॉजिक्स इन्फ्राटेक प्रायव्हेट लिमिटेडने विकसित केलेल्या नोएडा अपार्टमेंट कॉम्प्लेक्समधील तब्बल २६१ फ्लॅट बहुजन समाज पक्षाच्या (बीएसपी) अध्यक्षा आणि उत्तर प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री मायावती यांच्या भावाला आणि भावाच्या पत्नीला डिस्काऊंटमध्ये वाटप करण्यात आले आहेत. फसवणूक आणि अधोमूल्यांकन (डिस्काऊंट) देऊन हे फ्लॅट विकण्यात आले असल्याचे वृत्त 'द इंडियन' एक्सप्रेसने दिले आहे.

इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भात काही नोंदी तपासल्या आहेत. त्यामध्ये १२ वर्षांहून अधिक काळ म्हणजेच कंपनीच्या स्थापनेपासून दिवाळखोरीच्या कार्यवाहीपर्यंत आणि त्यानंतरच्या मे २०२३ च्या फॉरेन्सिक ऑडिटपर्यंतच्या घटनांच्या क्रमांचा इंडियन एक्स्प्रेसने अभ्यास केला आहे.

ऑडिट अहवालात म्हटले आहे की, दआनंद कुमार यांची २८.२४ कोटींची देयके दाखवणारे व्हाउचर गुंतवणूक म्हणून न दाखवता ग्राहकांकडून आगाऊ (Advanced) या शीर्षकाखाली दाखवण्यात आली आहेत. आनंद कुमार यांच्या पत्नी विचितेर लता यांच्यावरही अनियमिततेचे जवळपास असेच आरोप करण्यात आले होते. कमी किंमतीतून १२५ पैकी २४ युनिट्स इतरांना वाटप केले जात आहेत आणि याचे व्यवहार २८.८५ कोटी Logix द्वारे संबंधित पक्षांना कोणतेही स्पष्टीकरण न देता हस्तांतरित केले जात आहे, असेही ऑडिट अहवालात म्हटले आहे.'

कोळसा खाणीलाही विरोध होणार

सुराज्य/सोलापूर : कोराडी येथील २ बाय ६६० मेगावॉट वीजनिर्मिती प्रकल्पाला विरोध सुरू असतानाच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे १३ जुलै रोजी कोळसा खाणीसंदर्भात जनसुनावणी घेण्यात येणार आहे. विशेष म्हणजे अदानी समूहाला संबंधित खाण मिळाली आहे. अदानी समूहाच्या या खाणीला परवानगी द्यावयाची असल्याने कोराडीतील प्रस्तावित प्रकल्पाची सुनावणी इतक्या घाईने घेण्यात आल्याचा संशय पर्यावरणवाद्यांनी व्यक्त केला आहे.

केंद्रीय कोळसा मंत्रालयातर्फे कळमेश्वर तालुक्यातील गोंडखैरी कोळसा खाण अदानी पॉवर कंपनीला देण्यात आली आहे. यासंदर्भात १३ जुलैला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे जनसुनावणी घेण्यात येणार आहे. याचदरम्यान कोळसा मंत्रालयाने जिल्ह्यातील आणखी पाच खाणींचा लिलाव करण्याचा निर्णय घेतला आहे. कोराडीतील प्रस्तावित वीजप्रकल्पाला पर्यावरणाच्या कारणावरून चांगलाच विरोध झाला होता. पर्यावरणवाद्यांच्या विरोधानंतरही ही सुनावणी घेण्यात आली होती. यात प्रकल्पाला मोठा विरोध झाला होता. आता पुन्हा एकदा जिल्ह्यात कोळसा खाणीसाठी सुनावणी होणार असल्याने पर्यावरणवादी, नागरिकांकडून याला विरोध होण्याची शक्यता आहे. नागपूर जिल्ह्याला देशातील सर्वाधिक प्रदूषित बनवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही पर्यावरणवाद्यांचे म्हणणे आहे.

शिंदे-फडणवीस समोरासमोर

भाषणात सगळ्याच कुशंका उडवून लावल्या

पालघर: मुख्यमंत्रीपदाचा चेहरा म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्यापेक्षा एकनाथ शिंदे अधिक लोकप्रिय आहेत, असा दावा करणारी एक जाहिरात शिवसेनेकडून नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली होती. राज्यातील प्रमुख वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावर झळकलेल्या या जाहिरातीमुळे शिवसेना-भाजप युतीमध्ये मिठाचा खडा पडला होता. शिवसेनेकडून देण्यात आलेल्या या जाहिरातीविषयी भाजपचे केंद्रीय नेतृत्त्व आणि देवेंद्र फडणवीस प्रचंड नाराज असल्याची चर्चा होती. गेल्या दोन-तीन दिवसांत देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासोबतच्या कार्यक्रमांना तब्येतीचे कारण देत हजेरी लावणे टाळले होते. या सगळ्या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी पालघर येथे 'शासन आपल्या दारी' या कार्यक्रमाच्यानिमित्ताने एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस पहिल्यांदाच एकाच मंचावर दिसून आले. हे दोघेही समोर आल्यानंतर काय घडणार, याची उत्सुकता सर्वांनाच होती.

एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस हे दोघेही एकाच हेलिकॉप्टरने पालघरमध्ये उतरले. त्यानंतर शिंदे आणि फडणवीस वेगवेगळ्या गाड्यांना

कार्यक्रमस्थळी रवाना झाले. यावेळी शिंदे यांनी फडणवीसांना आपल्याच गाडीतून येण्याची विनंती केली. परंतु, फडणवीसांनी' तुम्ही चला' असे सांगत नम्रपणे ही ऑफर नाकारल्याचे सांगितले जाते. त्यानंतर कार्यक्रमाच्या व्यासपीठावरही हे दोन्ही नेते सुरुवातीला एकमेकांशी फारसे बोलताना दिसत नव्हते. जाहिरातीच्या वादानंतर दोघांमध्ये काहीसा ऑकवर्डनेस आल्याचे जाणवत होते. काही मोघम वाक्य सोडता एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात फारसा संवाद झाला नाही. एकूणच या दोन्ही नेत्यांमधील नेहमीची केमिस्ट्री दिसत नसल्याची चर्चा उपस्थितांमध्ये होती. त्यामुळे शिवसेनेच्या जाहिरातीमुळे देवेंद्र फडणवीस भलतेच नाराज झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. मात्र, देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी आपल्या भाषणात या सगळ्या शंका-कुशंका निकालात काढल्या. देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदेंनी आपल्या भाषणात आमच्या कोणतेही वितुष्ट नसल्याचे सांगत या वादावर पडदा टाकला.

चिमणीचा विषय संपला आता राजकारण रंगणार

विमानसेवा सुरू करण्याचे मोठे आव्हान भाजपसमोर असणार

सुराज्य/सोलापूर

जिल्ह्याच्या राजकारणात कळीचा मुद्दा ठरलेल्या श्री सिद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याची बेकायदेशीर चिमणी अखेर जमीन दोस्त झाली. या चिमणी पाडकाम प्रकरणावरून आगामी काळात सोलापूर शहरात मोठे राजकारण रंगण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. सोलापूर शहरात आगामी होणाऱ्या महापालिका लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत हाच मुद्दा विरोधकांकडून उपस्थित केला जाण्याची शक्यता आहे. त्यावर भाजप कशा पद्धतीने मात करते हे पाहणे आता औत्सुक्याचे ठरणार आहे. ज्या कारणासाठी चिमणी पाडण्यात आली ते कारण विमानसेवा आहे. आता हीच विमान सेवा सोलापूर विमानतळावरून सुरू करणे भाजप समोर मोठे आव्हान असणार आहे.

आता विमानसेवायेसाठी उशीर नको : सिद्धेश्वर चिमणी कारखान्याचे पाडकाम प्रकरण २०१७ पासून सुरू होते. अखेर सात वर्षांनी चिमणी पाडण्यात आली. विमानसेवेला अडथळा ठरते म्हणून सोलापूर विकासमंच सह अनेकांनी चिमणी करावी अशी मागणी लावून धरली होती. आता चिमणीचा विषय संपला आहे आता लवकरात लवकर विमान सेवा सुरू करावी, अशी मागणी शहरवासीयांमधून होत आहे. चिमणी पाडण्यास जेवढा उशीर झाला तेवढा तेवढा उशीर विमान उडवण्यासाठी नको असे मिश्किल विनोदही सोशल मीडियावर सध्या झळकत आहेत.

सिध्देश्वर साखर कारखान्याची चिमणी पाडण्यामागे भाजपचाच म्हणजे आमदार विजयकुमार देशमुख यांचा हात असल्याचा आरोप संस्थापक धर्मराज काडादी यांनी केला होता. त्याला आ. देशमुख यांनीही जोरदार प्रत्युत्तर दिले होते. राज्यात मध्यंतरी अडीच वर्षात महाआघाडीची सत्ता असताना काडादी यांनी राष्ट्रवादीच्या वरिष्ठ नेत्यांना हाताशी धरून चिमणी वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र महाआघाडीचे सरकार जाऊन भाजपची सत्ता आल्यानंतर मात्र ते चिमणीचा बचाव करू शकले नाही. अखेर महापालिकेने दिलेल्या मुदतीत बेकायदेशीर चिमणी पाडली नसल्याने महापालिका प्रशासनाने १६ जून रोजी चिमणी जमीनदोस्त केली. आता आगामी काळात या चिमणी पाडकामावरून मोठे राजकारण तापणार हे नक्की. सोलापूर शहरात येत्या काही महिन्यात महापालिका, लोकसभा आणि विधानसभा निवडणूक होणार आहे. विरोधकांकडूनच म्हणजे महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून चिमणी पाडकामाचा मुद्दा उचलला जाणार आहे.

चिमणी पाडून येथील शेतकरी, कामगारांना देशोधडीला लावण्याचा आरोप महाआघाडीच्या नेत्यांकडून होत आहे. धर्मराज काडादी यांच्यासह अनेक लिंगायत नेत्यांनी संपूर्ण लिंगायत समाजाचा अपमान आहे, त्यामुळे भाजपला निवडणुकीत हा समाज धडा शिकवेल असा इशारा दिला आहे. सोशल मीडियावर ही असेच मेसेज फिरत आहेत. आता भाजप या संपूर्ण प्रकरणावर काय भूमिका घेणार आणि यावर कशी मात करून विकासाचे राजकारण करणार याकडेच सर्वांचे लक्ष लागले आहे. सोलापूर शहरात भाजपचे दोन आमदार आहेत. दक्षिणमधून आमदार सुभाष देशमुख तर शहर उत्तर मधून विजयकुमार देशमुख प्रतिनिधित्व करत आहेत. दक्षिण मध्ये लिंगायत समाज मोठ्या संख्येने आहे त्याहीपेक्षा जास्त लिंगायत समाज शहर उत्तर मतदारसंघात आहे. त्यामुळे या दोन्ही मतदारसंघात भाजपला मोठी कडवी टक्कर द्यावी लागणार आहे. त्यामुळे आता भाजप यापुढे कोणती भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. चिमणी पाडकामाचा फटका भाजपला बसणार की नेत्यांनी इशारा केवळ फुसका बार याकडे आता सर्वांचे लक्ष लागून राहणार आहे.

स्थानबद्धतेचा आदेश रद्दबातल

सिध्देश्वर कारखान्याच्या उपाध्यक्षांसह ७ जणांची सुटका

सुराज्य/सोलापूर

कारखान्यातील अनधिकृत चिमणी पाडकामात अडथळा निर्माण करुन गुन्हा करण्याची शक्यता असल्याच्या कारणावरून स्थानबध्दतेत असलेल्या श्री सिध्देश्वर साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन, संचालक यांच्यासह ७ जणांच्या स्थानबद्ध करण्याचा आदेश जिल्हा व सत्र सत्र न्यायालयाने रद्दबातल केला.

यात हकिकत अशी की, श्री सिध्देश्वर साखर कारखान्याची अनधिकृत चिमणी पाडण्याचे आदेश महानगरपालिकेच्या आयुक्तांनी दिला होता. त्याप्रमाणे दि. ११ जून पासून चिमणी पाडकामास सुरूवात करण्यात आली होती. यावेळी चिमणी पाडकामात अडथळा निर्माण करुन कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करुन गंभीर गुन्हे करण्याची शक्यता असल्याने एमआयडीसी पोलीस ठाण्यात सिध्देश्वर साखर कारखान्याचे व्हा. चेअरमन सिध्दाराम बाबुराव चाकोते, संचालक अमर रतिकांत पाटील, महादेव रेवणसिध्दप्पा जम्मा यांच्यासह माजी संचालक सुधीर आण्णाराव थोबडे व कर्मचारी परमेश्वर हनुमंत हिरापुरे, नागनाथ देवराव पाटील आणि रेवणसिध्द रामचंद्र कारकले यांना दिनांक १३ जून पोलीसांनी अटक केली होती. त्यांना १९ जून पर्यंत स्थानबद्ध करण्याचा आदेश न्यायालयाने दिला होता.त्याप्रमाणे त्यांची रवानगी कोठडीत करण्यात आली होती. त्यामुळे अर्जदारांनी ॲड मिलिंद थोबडे यांच्यामार्फत सत्र न्यायालयामध्ये कोठडीतून सुटका होण्याकरिता अपिलं दाखल केले होते .सदर अर्जाच्या सुनावणी वेळी ॲड मिलिंद थोबडे यांनी आपल्या युक्तीवादामध्ये भारतीय राज्यघटनेत सर्वांना मुक्तपणे संचार करण्याचा हक्क व अधिकार प्राप्त आहे . पोलिसांनी केलेली कारवाई ही कायदेशीर हक्कांचे हनन करणारी व अन्यायकारक आहे. असे सांगून वादातील चिमणी पाडकामाचे काम पूर्ण झाले आहे.त्यामुळे अर्जदारांना कोठडीत ठेवण्याची आवश्यकता नसल्याचे मुद्दे मांडले. त्यास सरकार पक्षाने देखील हरकत नसल्याचे न्यायालयास कळवले. यावरून जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. एन.पांढरे यांनी अर्जदारांना मुक्त करण्याचे आदेश दिले. यात अर्जदारातर्फे ॲड मिलिंद थोबडे, ॲड विनोद सूर्यवंशी, ॲड राजकुमार मात्रे तर सरकार पक्षातर्फे जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंग राजपूत यांनी काम पाहिले.

तरुणाकडून गावठी पिस्टलसह दोन जिवंत काडतूस जप्त

सुराज्य/सोलापूर

माळशिरस येथील एका तरुणाकडून १ देशी बनावटीचे गावठी पिस्टल व २ जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. अजय सर्जेराव जाधव (२५, रा. घाडगे गल्ली, माळशिरस) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे सहायक पोलिस निरीक्षक शशिकांत शेळके यांना माळशिरस येथे राहणारा रेकॉर्डवरील गुन्हेगार अजय जाधव हा अवैध शस्त्र व जिवंत काडतूस स्वत:जवळ बाळगून परिसरात वावरत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार शेळके व त्यांचे पथक दोन पंचासह जाऊऊन त्यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून १ देशी बनावटीचे गावठी पिस्टल व २ जिवंत काडतूस जप्त करण्यात आले. या गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि शशिकांत शेळके करीत आहेत. ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सुहास जगताप यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे सहा. पोलिस निरीक्षक शशिकांत शेळके, सफौ ख्वाजा मुजावर, पोहेकॉ धनराज गाडे, प्रकाश कारटकर, मोहन मनसावाले, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, समीर शेख यांनी बजावली आहे.

वडाचीवाडीच्या विकासासाठी डीपीडीसीमधून निधी देणार : प्रा.सावंत

विकासकामांचे उद्घाटन व गुणवंताचा सत्कार

सुराज्य/माढा

वडाचीवाडी ग्रामस्थांनी लोकसहभागातून गावासाठी मोठे काम केले असून गावच्या विकासासाठी जिल्हा नियोजन समितीतून निधी उपलब्ध करून देणार असल्याचे शिवसेना (शिंदे गट) समन्वयक प्रा शिवाजीराव सावंत यांनी सांगितले.

वडाचीवाडी (अ) ग्रामपंचायतच्या वतीने विविध विकासकामांचे उद्घाटन आणि दहावी व बारावी पास झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्काराप्रसंगी ते बोलत होते. यावेळी सर्व ग्रामस्थांना ग्रामंपचायतीच्या वतीने मोफत दळण योजनेचे उद्घाटन करण्यात आले. लोकसहभागातून बनवण्यात आलेल्या ऑक्सीजन पार्कला प्रा. शिवाजीराव सावंत यांनी भेट देऊन पाहणी केली.या उपक्रमाचे कौतुक करतानाच गावच्या विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नसल्याचे सांगितले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना प्रा सावंत यांनी उच्चशिक्षणासंदर्भात मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले. यावेळी तालुकाप्रमुख मुन्ना साठे, माढा शहर प्रमुख भैय्या खरात, सरपंच रमेश भोईटे, उपसरपंच रमेश कदम, ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग कोलगे, रोहिदास जाधव, बंटी जगताप, विक्रम कदम, कमलाकर कदम, विक्रम भोईटे, राजेंद्र सोमासे, विजय भोईटे आणि ग्रामसेवक संजय क्षीरसागर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार मार्तंड जगताप यांनी केले

पंढरपुरात ८०० लिटर हातभट्टी दारूसह २ वाहने जप्त

सोलापूर : राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पंढरपूरच्या पथकाने गुरुवारी पंढरपूर शहर परिसरात हातभट्टी दारूच्या वाहतुकीचा गुन्हा नोंदविला असून ८०० लिटर हातभट्टी दारूसह २ वाहने जप्त केली आहेत. गुरुवारी पहाटेच्या सुमारास पंढरपूर किरण बिरादार यांनी भीमा नदीच्या पुलावर कुमार धनाजी राठोड (वय २४, रा. खेड, ता. उत्तर सोलापूर) याच्या कारमधून पाच रबरी ट्यूबमध्ये पाचशे लिटर हातभट्टी दारू जप्त केली.

एका अन्य कारवाईत दुय्यम निरीक्षक पंढरपूर मयूरा खेत्री यांनी त्यांच्या पथकासह यशवंत बंडू राठोड (वय २०, रा. गुळवंची तांडा, ता. उत्तर सोलापूर) याला दुचाकीवरून तीन रबरी ट्यूबमधून ३०० लिटर हातभट्टी दारूची वाहतूक करताना अटक केली.ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक नितीन धार्मिक यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक किरण बिरादार, दुय्यम निरीक्षक मयुरा खेत्री, दुय्यम निरीक्षक जीवन मुंढे, जवान गणेश रोडे, प्रकाश सावंत व रामचंद्र मदने यांनी पार पाडली.

विलास यामावर यांनी घेतला पदभार

अक्कलकोट : अक्कलकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणुन विलास यामावार यांनी चार्ज घेतला.

येथील उपविभागीय पोलिस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांची बदली झाल्याने त्यांच्या जागेवर सोमवारी यामावार रूजु झाले. ते बुलढाणा जिल्हा मेहकर डिव्हीजन येथे ते कार्यरत होते. अक्कलकोट येथील समस्या काय आहेत याची आधी माहिती घेऊन त्याद्दष्टीने उपाययोजना करू. भाविकांना गैरसोय होणार नाही. याची याबाबत दक्ष राहु असे यामावार यांनी सांगितले.

निर्मलाताई ठोकळ प्रशालेत विद्यार्थ्यांचे स्वागत

सुराज्य/सोलापूर

इंदिरा ज्ञानवर्धिनी सोलापूर संचलित निर्मलाताई ठोकळ प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय सोलापूर येथे विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी जय्यत तयारी करण्यात आली होती. शाळेच्या अंगणात फुले, रांगोळीच्या पायघड्या घातल्या होत्या. सगळीकडे गुलाबाचा व विद्यार्थ्यांसाठी केलेल्या गोड पदार्थाचा सुगंध दरवळत होता.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ ची सुरुवात जि.प. शिक्षणाधिकारी सुलभा वठारे यांनी शाळेची घंटा वाजवून केली. शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांचे औक्षण करुन, गोड साखर देऊन व गुलाब पुष्प उधळून स्वागत करण्यात आले. विद्यार्थांना शाळेच्या पहिल्याच दिवशी नवागत विद्यार्थी विद्यार्थिनिंना मान्यवरांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात गणवेश, पाठ्यपुस्तके, टिफीन बॅग, शाळेचे दप्तर देण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी डोरेमॉन, डोनाल्ड डक विद्यार्थी विद्यार्थिनी यास्वागतामुळे भारावून गेले. तसेच इयत्ता १०वी मार्च २०२३ मधील गुणवंतांचा गौरव यावेळी करण्यात आला. यावेळी आधारवड या चित्रपटातील अभिनेते रोहित हांचाटे, संस्थेच्या संचालिका शिल्पा ठोकळ, राजेश कुलकर्णी, संस्थेचे सचिव भिकाजी गाजरे, चिंचोळकर, प्राचार्य डी.डी.गाजरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पालक, परिसरातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन एस.एन. जकवडर, यू. व्ही. लंबे यांनी केले तर आभार प्रदर्शन पी. एल. पाटील यांनी केले.

प्रवाशाच्या डोक्यात घातला दगड

सोलापूर : प्रवास भाड्याच्या कारणावरून रिक्षाचालकाने प्रवाशाला गप्प भाडे दे म्हणत त्याच्या डोक्यात दगड घालून जखमी केले आहे. याप्रकरणी जखमी प्रवासी विकास श्रीशैल माने (वय २३, रनई जिंदगी) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून बबलू निकंबे (रा. कुमठा नाका) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

विकास माने यांना आरोपी बबलू याने शंभर रूपये भाड्याची मागणी केली शिवाय शिवीगाळ करत गप्प भाडे दे असे म्हणत दमदाटी करत हाताने मारहाण करून जखमी केले. बबलू निकंबे याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास नवले करत आहेत.

अनुकंपा नोकरभरती कर्मचारी संघटनेकडून आंदोलनाचा इशारा

२० जूनपासून विविध टप्प्याने करणार आंदोलन

सुराज्य/सोलापूर

अनुकंपा नोकरभरती त्वरीत सुरू करून अनुकंपाधारकांना न्याय मिळवून द्या, अन्यथा येत्या २० जूनपासून विविध प्रकारची आंदोलने करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य महसूल चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे.

कर्मचारी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष शंतनू गायकवाड यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन अनुकंपा नोकरभरतीप्रश्नी इशारा दिला आहे. अनुकंपा नियुक्तींची प्रकरणे प्रदीर्घ काळ प्रलंबित राहिल्याने अनुकंपा उमेदवारांवर अन्याय होत आहे. त्यामुळे अनुकंपा तत्वावरील नियुक्तींची कार्यवाही जलदगतीने पूर्ण करून तसा अहवाल शासनास सादर करण्याबाबत अपर मुख्य सचिवांनी सूचना दिली आहे. त्यानुसार अनुकंपा उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी करण्यात आली. याला दहा महिने उलटली तरी त्यांना अद्याप नेमणुकीचे आदेश दिलेले नाहीत. आता यावर कार्यवाही करण्यात यावी, अन्यथा २० जून रोजी काळ्या फिती लावून कामकाज करणे, २२ जून रोजी जेवणाच्या सुटीत निदर्शने करणे, २६ जून रोजी एक दिवस धरणे आंदोलन आणि २९ जूनपासून बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा गायकवाड यांनी आपल्या निवेदनात दिला आहे.

"स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" - कर्मवीर
स्थापना-१९६७
प्रवेश !.. प्रवेश !..
रयत शिक्षण संस्थेचे,
श्रीनाथ विद्यालय व कै.वि.उर्फ बाबासाहेब शं.पाटील कनिष्ठ महाविद्यालय,बोरगांव.
ता.माळशिरस जि.सोलापूर
" बहुजनांचा विकास हाच आमचा ध्यास "
मा.श्री.राजकुमार (नाना) पाटील यांचे मार्गदर्शनाखाली
इ.५ वी ते इ.१२ वी मराठी व सेमी इंग्रजी माध्यम प्रवेश सुरू
* आमच्या विद्यालयाची वैशिष्ट्ये *
१) भव्य व प्रशस्त इमारत
२) उत्कृष्ठ निकालाची परंपरा
३) अनिवासी रयत गुरूकुल प्रकल्प (इ.५ वी ते इ.१० वी)
४) विषयनिहाय सुसज्ज प्रयोगशाळा
५) समृध्द ग्रंथालय
६) शिस्तबध्द शाळा व शैक्षणिक वातावरण
७) स्वतंत्र व आकर्षक संगणक कक्ष
८) LCD प्रोजेक्टर व इंटरनेट सुविधा
९) उच्च शिक्षित,अनुभवी व उपक्रमशिल शिक्षक वर्ग
१०) विद्यार्थीनिहाय वैयक्तिक मार्गदर्शन
११) RO पिण्याच्या पाण्याची सोय
१२) आधुनिक स्वच्छतागृह
१३) सुसज्ज अटल लॅब
१४) इ.५वी व इ.८वी च्या विद्यार्थ्यांना मोफत प्रवेश (परीक्षा,संगणक व इतर फी लागू)
* विद्यालयात राबविले जाणारे उपक्रम *
१) संगणक शिक्षण (इ.५ वी ते इ.८ वी)
२) E-Learning
३) डिजीटल क्लासरूम
४) ज्ञानरचनावादावर आधारित कृतियुक्त अध्ययन-अध्यापन
५) शासकीय योजना व शिष्यवृत्यांचा लाभ
६) विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन (NTS,MTS,NMMS,RTS,) माध्यमिक शिष्यवृत्ती,रयत ऑलिंपीयाड,एलिमेंटरी व इंटरमिजिएट चित्रकला ग्रेड परीक्षा व क्रीडा)
७) वार्षिक स्नेहसंमेलन
९) आरोग्य तपासणी
११) वनभोजन
१३) क्रीडा स्पर्धा
१५) स्पोकन इंग्लिश प्रकल्प
१७) मध्यान्ह भोजन व पुरक आहार
१९) विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास
२१) मोफत हिवाळी व उन्हाळी वर्ग जादा तास
२३) प्रस्तावित इ.११ वी साठी (Crop Science) कृषी विज्ञान
२४) शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी इ.१२ वी विज्ञान शाखेसाठी वैद्यकीय प्रवेश परीक्षा-NEET,इंजिनिअरींग साठी JEE आणि MH-CET इ.परीक्षा मार्गदर्शन.
२५) माध्यमिक शिष्यवृत्ती इ.५ वी व इ. ८ वी स्वतंत्र वर्ग भरवून मार्गदर्शन.
८) पालक मेळावा
१०) वृक्षारोपण
१२) शैक्षणिक सहल व क्षेत्रभेट
१४) व्यवसाय मार्गदर्शन
१६) प्रात:अभ्यासिका
१८) ग्राम स्वच्छता अभियान
२०) स्काऊट गाईड विभाग
२२) R.S.P. विभाग
आपले विनीत-: शाळा व्यवस्थापन समिती | स्थानिक स्कूल कमिटी | मा.प्राचार्य व सर्व सेवक वृंद
संपर्क-मा.श्री.राजकुमार (नाना) पाटील-९९२१२५५४४४,प्राचार्य-श्री कांबळे सर-९९७०४०७८३५,श्री ढवळे सर -९८९०८७२४३५,श्री कोळी सर-९६८९३८४०५५
ज्युनिअर कॉलेज-विज्ञान-श्री बेलभंडारे सर-९३७३८४५५२२,कला -श्री आलदर सर-७७०९६४५५३८,वाणिज्य-श्री रोडगे सर-९२८४०५२२२१

आषाढी यात्रेत वारकऱ्यांसाठी पंढरपुरात तीन ठिकाणी महाआरोग्य शिबिर

प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी घेतला आढावा

सुराज्य/सोलापूर

आषाढी यात्रा सोहळ्यानिमित्त पंढरपुरात विविध जिल्ह्यातून तसेच परराज्यातून मोठ्या संख्येने भाविक येतात. येणाऱ्या वारकरी भाविकांच्या आरोग्य तपासणीसाठी आरोग्य विभागाच्या वतीने मोफत महाआरोग्य शिबिर घेण्यात येणार आहे. पंढरपूरातील वाखरी, गोपाळपूर व शेगांव दुमाला (६५ एकर) या ठिकाणी महाआरोग्य शिबिर आयोजित केले जाणार आहे.

या शिबिराचा आढवा प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी घेतला शिबिरासाठी लागणाऱ्या आवश्यक सोयी-सुविधांची संबधित यंत्रणेने तात्काळ पूर्तता करावी अशा सूचना त्यांनी यावेळी बैठकीत केल्या. २७, २८ व २९ या कालावधीत महाआरोग्य महाआरोग्य शिबिराकरिता उपजिल्हाधिकारी सदाशिव पडदुणे यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक केली. महाआरोग्य शिबिर पूर्वनियोजन बैठक पंढरपुरातील शासकीय विश्रामगृहात प्रभारी जिल्हाधिऱ्यांनी घेतला. या बैठकीस आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकृष्ण पवार दूरद्दष्यप्रणालीव्दारे तर उपविभागीय अधिकारी गजानन गुरव, उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय पाटील, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सोनिया बागडे, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, गटविकास अधिकारी प्रशांत काळे, मुख्याधिकारी अरविंद माळी, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, भैरवनाथ साखर कारखान्याचे अध्यक्ष प्रा. शिवाजी सावंत उपस्थित होते. आषाढी यात्रा कालावधीत भाविकांना तात्काळ व दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी यात्रा कालावधीत पंढरपूर येथे तीन ठिकाणी महाआरोग्य शिबिर घेण्यात येणार आहे. या शिबिरात सुसज्ज आरोग्य यंत्रणेसह तज्ज्ञ डॉक्टरांच्या सेवा झाली पाहिजे. महाराआरोग्य शिबिराच्या ठिकाणी नगरपालिकेने स्वच्छ व मुबलक पिण्याचे पाणी, स्वच्छता, शौचालय तसेच अग्निशमन व्यवस्था उपलब्ध करावी. तसेच आवश्यक ठिकाणी मुरूमीकरण करुन घ्यावे, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या.

या केल्या सूचना : यात्रा कालावधीत वादळी वारा व पावसाची शक्यता लक्षात घेता महावितरण विभागाने शिबिरस्थळी सुरक्षित व अखंडित वीज पुरवठा करावा. औषध पुरवठा करणाऱ्या वाहनांस पोलीस प्रशासनाने वाहन पासेस उपलब्ध करावेत. तसेच आरोग्य तपासणीसाठी वारकरी भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता आवश्यक ते नियोजन करावे. या आरोग्य शिबिराचा जास्तीत-जास्त भाविकांना लाभ मिळावा यासाठी आरोग्य विभागाने प्रचार व प्रसार करावा अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

महिला-पुरूषांसाठी स्वतंत्र व्यवस्था : महाआरोग्य शिबिरात महिला व पुरुष वारकरी भाविकांची आरोग्य तपासणीची नाव नोंदणीची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. वारकऱ्यांची सुरूवातीस तपासणी, रोग आढळून आल्यास त्वरित उपचार, विनामूल्य औषधे, गरज असल्यास मोफत सेवा, महात्मा फुले प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेमार्फत मोफत शस्त्रक्रिया देखिल केली जाणार आहे. दृष्टीदोष असणाऱ्यांना मोफत चष्मा वाटप करण्यात येणार आहे. तरी वारकरी भाविकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय पाटील यांनी केले आहे.